



# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. २७.१२.२०२४ | अंक नं. २५१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020







# भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग कालवश

## सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर



मुंबई – भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे २६ डिसेंबरला नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात निधन झाले. डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे भारत सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दुखवटा २६ डिसेंबरपासून १ जानेवारी २०२५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) पाळला जाईल. या काळात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल आणि शासकीय मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत.

डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर २८ डिसेंबर रोजी शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या अंतिम संस्काराच्या दिवशी देश–विदेशातील सर्व भारतीय दूतावासांमध्येही राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येईल.

मनमोहन सिंग अनेक दिवसांपासून आरोग्यविषयक समस्यांचा सामना करत होते. काल अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात ८ वाजण्याच्या सुमारास दाखल करण्यात आले होते. त्यांना श्वसनाचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल होतं. यावेळी एम्स रुग्णालयात दिग्गज डॉक्टरांच्या टीमने त्यांच्यावर उपचार केले. यावेळी मनमोहन सिंह यांच्या फुफ्फुसांमध्ये इन्फेक्शन झाल्याची माहिती समोर आली. डॉक्टरांनी लगेच मनमोहन सिंह यांच्यावर उपचार सुरु केले. पण त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती तेव्हाच समोर आली होती. यानंतर काँग्रेसच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी आणि खासदार प्रियांका गांधी या एम्स रुग्णालयात दाखल झाल्या. त्यानंतर मनमोहन सिंह यांचे निधन झाल्याची दुर्दैवी बातमी आली. मनमोहन सिंग ३३ वर्षे खासदार होते. विद्वान, मृदू, मितभाषी आणि संवेदनशील नेता म्हणून मनमोहन सिंग यांच्याकडे पाहिले जायचे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर ते पहिलेच असे पंतप्रधान होते, जे १० वर्षे देशाचा राज्यकारभार सांभाळू शकले. २००४ ते २०१४ अशी दहा वर्ष ते देशाचे पंतप्रधान होते. तसेच १९९८ ते २००४ या काळात ते राज्यसभेचे विरोधी पक्षनेतेही होते.


SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite

सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## भक्कम बँकींग... भक्कम अर्थव्यवस्था

मागील दशकात एनपीए, कर्जबुडी, बँकींगमध्ये काहीसे चिंतादायक वातावरण होते. पण गेल्या १० वर्षात महत्त्वपूर्ण पाऊले व त्याची अंमलबजावणी झाल्याने सध्या विशेषतः बहुसंख्य सार्वजनिक बँका उंच भरारी घेत असून त्या भक्कम पायावर उभ्या राहिल्या आहेत.

केंद्रीय मंत्रालयाच्या अहवालात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या मजबूत स्थितीबद्दल आलेली माहिती देशाच्या बदलत्या अर्थव्यवस्थेतील सुधारणांवर प्रकाश टाकते. त्याप्रमाणे या बँकांचे एनपीए अर्थात बुडीत कर्जे १० वर्षातील नीचांकी पातळीवर आली आहेत. बँकींग क्षेत्रासाठी ही निश्चितच मोठी उपलब्धी आहे.

प्रदीर्घ काळापासून प्रलंबित राहिलेल्या कर्जाचा बोजा वाढल्याने बँकींगसह एकूणच उद्योगधंदे, अर्थव्यवस्थेच्या अडचणी वाढत होत्या. त्या अहवालानुसार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची बुडीत कर्जे Bad Debts गेल्या ६ वर्षात १४.५८% नी कमी होऊन ३.१२% वर आली आहेत.







बहुसंख्य बँका नफ्यात येऊन प्रगतीपथावर पुढे जात आहेत. आपल्याला पक्षीय राजकारणात जायचे नसले तरी २००४ ते २०१२-१३ किती बिकट स्थिती झाली होती बँकींग व अर्थव्यवस्थेची!

नव्या पिढीला याचीही वस्तुनिष्ठ माहिती घ्यावी लागेल. आपल्या जिल्ह्यातही बँका, उद्योगधंदे वाढण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे लागतील. विशेषतः सहकारी बँका, पतसंस्था यांची परिस्थिती गांभीर्याने सुधारावी लागेल. पटतंय का...

# जंगली प्राण्यांकडून शेतीपिकांच्या होणाऱ्या नुकसानीबाबत वन विभागाशी संपर्क साधा

**भारतीय जनसंसदेचे शेतकऱ्यांना आवाहन**

नगर - जंगली प्राण्यांकडून शेती पिकांच्या होणाऱ्या नुकसानीबाबत वनविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन माजी पंचायत समिती सदस्य तथा भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर रानडुकरांनी हरभरा, मका, तूर आदी शेती पिकांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान सुरू केलेले आहे. हरीण, डुक्कर, नीलगाय, रोही, माकड, हत्ती इ. जंगली प्राण्यांकडून महाराष्ट्रामध्ये शेती पिकांचे मोठे नुकसान होत आहे. जिल्ह्यामध्ये व विशेषतः नगर तालुक्यामध्ये रानडुकरांची संख्या सर्वाधिक आहे .

रानडुकरांनी केलेल्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांनी प्रथमतः आपल्या पिकाची नोंद ई. पीक पाहणी द्वारे सातबारा उताऱ्यावर करावी. नंतर सातबारा उताऱ्यासह, आधार कार्ड, बँकेचे पासबुक, स्वतःचा फोटो घेऊन वनविभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. वनविभागाच्या कार्यालयामध्ये नुकसानभरपाई मिळविण्यासाठीचा फॉर्म झेरॉक्स स्वरूपात मिळतो. जर आपल्या गटामध्ये सहकब्जेदार असेल तर त्याची नाहरकतही वन विभागाला द्यावी लागते. वन विभागाचे कर्मचारी दहा दिवसांमध्ये संबंधित ठिकाणचा पंचनामा करण्यासाठी येतात. त्यावेळी शेतकऱ्यांनी दोन पंच, गाव कामगार तलाठी व शेती विभागाचे कृषी सहाय्यक यांच्यासह हजर राहायचे असते. पंचनामा पूर्ण झाल्यानंतर नुकसान भरपाई देण्याची प्रक्रिया करण्यात येते. दुर्दैवाने अहिल्यानगर जिल्ह्यामधे वनविभागाचा कर्मचारी वर्ग अतिशय कमी प्रमाणात असल्यामुळे भरपाईसाठी वेळ जास्त लागत आहे. शासनाने वनविभागाचे कर्मचारी वाढविण्यासोबतच नुकसान भरपाई ची पुरेशी रक्कम शेतकऱ्यांना देण्याचे आवाहन भारतीय जन संसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, कैलास पठारे, अशोक ढगे, वीरबहादूर प्रजापती, बबलू खोसला, सुनील टाक, अशोक डाके, जसवंत सिंग परदेशी, रईस शेख व सुधीर भद्रे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## औषधोपचारादरम्यान युवकाचा नगरमध्ये मृत्यू

नगर - औषध उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केलेल्या ३८ वर्षीय शरद दशरथ रायकर (रा. हंगेवाडी, ता. श्रीगोंदा) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना नगर येथील मोरया हॉस्पिटल येथे घडली.

याबाबतची माहिती अशी की, शरद रायकर (राहणार हंगा, श्रीगोंदा) यास लिव्हर व किडनीचा आजार असल्याने त्यास औषधोपचाराकरिता २३ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास मोरया हॉस्पीटल अ.नगर येथे दाखल केले. शरद रायकर यास लिव्हर व किडनीचा आजार असल्याने त्याच्या शरीरात अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याने उपचारादरम्यान तो मयत झाला, असे डॉक्टरांनी घोषित केले. या प्रकरणी मोरया हॉस्पीटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ.राहुल बोऱ्हाडे यांनी दिलेल्या माहितीवरुन कोतवाली पोलिसांनी बी एन एस एस कलम १९४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद केली. अधिक तपास पोलिस हवालदार आनंद दाणी हे करीत आहेत.

## नानासाहेब भदागे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - चिखली, ता. श्रीगोंदा येथील रहिवासी नानासाहेब हारकु भदागे (वय ७१) यांचे २६ डिसेंबर रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर चिखली येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मारुती, संजय, रामदास भदागे यांचे ते वडील होत.

## सतिष गुंजाळ यांचे अल्प आजाराने निधन



नगर - केडगाव येथील रहिवासी सतिष गुंजाळ (वय ६०) यांचे २७ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी, २ मुले, सुन असा परिवार आहे. वैभव यांचे ते वडील होत.

## श्रीमती पुष्पाबाई मुनोत यांचे अल्प आजाराने निधन



नगर - गांधी चौक, वांबोरी येथील रहिवासी श्रीमती पुष्पाबाई रमणलाल मुनोत (वय ७८) यांचे २७ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर वांबोरी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पती, दीर, भावजय, नातवंडे असा परिवार आहे. चौथमल कस्तुरचंद मुनोत यांच्या त्या वहिनी होत.

## भगवानराव घोरपडे पाटील यांचे निधन



नगर - येथील भगवानराव घोरपडे पाटील (वय ९०) यांचे २७ डिसेंबर रोजी सकाळी नगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये निधन झाले. वैजू बाभुळगाव, ता. पाथर्डी या त्यांच्या मुळगावी त्यांच्यावर २७ डिसेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुले किशोर व राजू (इंजिनिअर जर्मनी), ५ मुली, नातवंडे असा परिवार आहे. ते आकाशवाणी माजी वार्ताहर, नगर प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष अनिल पाटील यांचे सासरे होत.

श्री क्षेत्र पंढरपूर येथील तनपुरे महाराज यांच्या चारोधाम ट्रस्टचे विश्वस्त, पाथर्डी पंचायत समिती आदी विविध सामाजिक संस्थांशी घोरपडे पाटील यांचे निकटचे संबंध होते.

## अमृतलाल डुंगरवाल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी अमृतलाल धनराज डुंगरवाल (वय ६८) यांचे २७ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर टाकळी ढोकेश्वर येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे १ भाऊ, ३ मुले, सुना, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आनंद, अभय, भागेश यांचे ते वडील होत.

## नुपुर कांबळे हिचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील कु. नुपुर संतोष कांबळे (वय २३) हिचे मध्यरात्री १२:२० वा. पिंप्री चिंचवड, पुणे येथे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

संगमनेर रोड येथील कांबळे सोडा व सर्व्हिस स्टेशनचे मालक दिगंबर बाबुराव कांबळे यांची नात, संतोष कांबळे यांची कन्या, सचिन कांबळे यांची पुतणी होत.

# मत्स्य पालनचा ठेका अधिकाऱ्यांनी परस्पर दिला दुसऱ्याच व्यक्तीला

**अनागोंदी कारभारामुळे महिलेच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ; ६ जानेवारीपासून उपोषणास बसणार**



नगर - स्थानिक आदिवासी महिलेला डावलून व कोणतीही पूर्व कल्पना न देता मौजे गोळेगाव (ता. शेवगाव) येथील पाझर तलावातील मत्स्य पालनचा ठेका दुसऱ्या व्यक्तीला दिल्याप्रकरणी चौकशी करुन स्थानिक आदिवासी महिलेला ठेका परत देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब ढवळे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. उपविभागीय जलसंधारण अधिकारीच्या अनागोंदी कारभारामुळे मत्स्य पालनचा व्यवसाय करणाऱ्या कुसूम पवार या महिलेच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तर सदर महिलेला न्याय मिळण्यासाठी ६ जानेवारी पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

कुसुम अंकुश पवार या मौजे गोळेगाव (ता. शेवगाव) येथे राहत असून, त्यांचे पती अपंग आहेत. त्या स्वतः सन २००१ पासून पाझर तलावातील मत्स्य पालनचा ठेका घेऊन कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. त्या सरकारी नियमानुसार ग्रामपंचायत करून टेंडर घेऊन व्यवसाय करीत असताना १२ मार्च रोजी गोळेगाव ग्रामपंचायत व ग्रामसेवक यांना उपविभागीय जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (नेवासा) यांनी नोटीस देऊन जलाशयाचा ताबा सोडण्याचे सांगितले. सरकारी नियमानुसार तळ्याचे टेंडर संपत आले असले तरी, संबंधित ग्रामपंचायत, ग्रामसेवक व पूर्वीच्या ठेकेदारास दोन महिने अगोदर नोटीस देणे आवश्यक होते. तरी देखील त्यांना नोटीस न देता परस्पर हा ठेका दुसऱ्या व्यक्तीला देण्यात आला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

याप्रकरणी पाठपुरावा केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी चौकशीचे आदेश दिले असताना संबंधित जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी लघुपाटबंधारे, बीडीओ, ग्रामसेवक यांच्यावर कुठलीही कारवाई न करता देण्यात आलेल्या पत्राला केराची टोपली दाखविण्यात आली आहे. कुसुम पवार या भिल्ल समाजाच्या असून अशिक्षित व भूमीहीन आहे. त्यांचे कुटुंबीय पूर्णतः मत्स्य व्यवसायावर अवलंबून आहे. ते स्थानिक असताना देखील सदरचा ठेका लांब राहणाऱ्या व्यक्तीला देण्यात आला आहे. एक प्रकारचा त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. या अन्यायाच्या विरोधात ढवळे यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

## माळीवाडा बसस्थानक येथून तरुणी बेपत्ता

नगर - प्रोफेसर कॉलनी येथे कामाला जाते असे सांगून २३ वर्षीय तरुणी माळीवाडा बसस्थानक येथून कोठेतरी निघून गेली. ही घटना २६ डिसेंबरच्या सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घडली. ती अद्याप घरी परतली नाही.

याबाबतची माहिती अशी की, सारसनगर परिसरात राहणारी २३ वर्षीय तरुणी २६ डिसेंबर रोजी सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास माळीवाडा बसस्थानक येथून प्रोफेसर कॉलनी कलानगर कॉर्नर येथे ऑफिसमध्ये काम करण्यासाठी जाते असे सांगून गेली. ती अद्याप घरी परतली नाही. याबाबत तिच्या घरच्यांनी त्यांच्या शेजारी राहणारे, तसेच नातेवाईकांकडे विचारपूस केली असता त्यांना काही एक माहिती मिळाली नाही, यावरून कोतवाली पोलीस ठाण्यात बेपत्ता तरुणीच्या पालकांनी दिलेल्या फिर्यादीवरून हरवल्याची नोंद केली आहे.

बेपत्ता तरुणीचे वर्णन असे वय २३, उंची पाच फूट पाच इंच, रंग गोरा, चेहरा उभट , नाक सरळ, डोळे तरतरीत, शरीरबांधा सडपातळ, पिवळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस व गुलाबी रंगाचे जॅकेट असे आहे. कोतवाली पोलीस तिचा तपास घेत आहे.

# पीएम योजनेत अहिल्यानगर शहरासाठी लवकरच मिळणार ४० ई बसेस; केडगावात चार्जिंग स्टेशन उभारणीचे काम सुरू

नगर - केंद्र सरकारच्या शहरी विकास मंत्रालय मार्फत देशभरात पीएम ई-बस सेवा योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. केंद्र शासनाने जाहिर ई निविदेद्वारे, बसेस पुरविण्यासाठी जे बी एम इकोलिफे मोबालिटी (Ecolife Mobility) प्रा. लि. नवी दिल्ली या कंपनीची निवड केलेली आहे. या योजनेत देशातील १६९ शहरांचा समावेश करण्यात आला असून अ.नगर शहरासाठी ४० ई-बसेस उपलब्ध होणार आहेत. त्यासाठी महापालिका केडगाव येथे चार्जिंग स्टेशन उभारत आहे. महावितरणकडून चार्जिंग स्टेशनच्या प्रस्तावित जागेपर्यंत वीज पुरवठा उपलब्ध करण्याचे काम सुरू आहे. पहिल्या टप्प्यात दहा बसेस उपलब्ध होणार असून, लवकरच या बसेस उपलब्ध होणार असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.



पी एम ई-बस सेवा योजनेसाठी केंद्र सरकारने १६ ऑगस्ट २०२३ रोजी २० हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यातून १६९ शहरांना तब्बल १० हजार ई-बसेस उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. २० ते ४० लाख लोकसंख्येच्या शहरात प्रत्येकी १५०, १० ते २० लाख व ५ ते १० लाख लोकसंख्येच्या शहरात प्रत्येकी १०० व ५ लाखांच्या आतील लोकसंख्येच्या शहरात प्रत्येकी ५० पर्यंत ई-बसेस उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. नगर शहराला गरजेनुसार ३५ सीटच्या ४० बसेस उपलब्ध होणार आहेत. केंद्र शासनाने बस उपलब्ध करून देण्यासाठी नवी दिल्ली येथील कंपनीला काम दिले आहे.

चार्जिंग स्टेशनसाठी महापालिकेने केडगाव येथील अडीच एकर जागा निश्चित केली आहे. तेथे वीज भार मंजूर झालेला आहे. सोनेवाडी सबस्टेशनपासून महापालिकेच्या सबस्टेशनपर्यंत विजेचा पुरवठा करणारी उच्चदाब वाहिनी टाकण्याचे काम महावितरण मार्फत सुरू आहे. या कामाचा खर्च केंद्र सरकार करणार असून हा १.९७ कोटी रुपयांचा निधी थेट महावितरणकडे वर्ग झाला आहे.

तसेच, चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी ९.०६ कोटी रुपये मंजूर असून त्याचे कामही सुरु झाले आहे. कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या असून, लवकरच हे कामही पूर्ण होईल, असे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.




## शहरातील मुख्य बाजारपेठेत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या डाळमंडई भागात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. कुत्र्यांच्या टोळके रस्त्यावर फिरत असून, ते नागरिकांचा चावा घेत आहेत. त्यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. महापालिकेने याबाबत तातडीने लक्ष घालून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. (छाया - धनेश कटारिया)

## एम बी ए/एम एम एस तसेच एमसीए प्रवेश परीक्षा २०२५ साठी नोंदणीच्या तारखा जाहीर

IMS AHMEDNAGAR

नगर - महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा सेल तर्फे प्रतिवर्षी उच्च व तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. वर्ष २०२५ मध्ये घेतल्या जाणाऱ्या एमबीबी/एमएमएस तसेच एमसीए या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी ऑनलाईन नोंदणी ची मुदत २५ डिसेंबर २०२४ ते २५ जानेवारी २०२५ अशी आहे. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या कालावधीत आपली नोंदणी पुर्ण करावी असे आवाहन आयएमएसचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी केले आहे.

सदर नोंदणी सी ई टी सेल च्या www.mahacet.org या नोंदणी स्थळावर करता येईल, अशी माहिती आयएमएसचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी दिली.

यासंदर्भात विद्यार्थ्यांना काही मार्गदर्शन, माहिती हवी असल्यास त्यांनी एमबीएसाठी प्रो. सय्यद मुदस्सर (९८८१४ ५८५७९) व एमसीएसाठी डॉ. संजय भक्कड (९८५०५८५५५१) यांच्याशी संपर्क साधावा.

# दहावीच्या विद्यार्थ्यांना नीट, आयआयटी-जेईई, एमएचटी- सीईटी इ. पूर्व परीक्षांचे मोफत मार्गदर्शन

नगर - १० वी पास झाल्यावर विद्यार्थ्यांना पुढे काय करायचं हा प्रश्न पडलेला असतो. काहीना इंजिनियर, काहीना मेडीकल क्षेत्रात, काहीना आर्मी, नेव्ही तसेच एअर फोर्स मध्ये करियर करायचं असत. खूप वेळा योग्य मार्गदर्शन व माहिती न मिळाल्यामुळे ठरवलेले असून देखली योग्य मार्ग सापडत नाही. जर तुम्हालाही हा प्रश्न पडला असेल तर चिंता करण्याची गरज नाही कारण नगरमध्ये जनशक्ती जुनियर कॉलेज येथे १० वी च्या विद्यार्थ्यांना मोफत करिअर मार्गदर्शन केले जाते.

शहराच्या मध्यवर्ती वसलेलं, पुणे/माळीवाडा बस स्थानकापासून ५ मिनिटाच्या अंतरावर, आनंद धाम समोर असणाऱ्या जनशक्ती जुनियर कॉलेजमध्ये १० वी च्या विद्यार्थ्यांना मोफत करिअर मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थाची आवड, त्याची बौद्धिक क्षमता विचारात घेऊन त्याने कोणती शाखा निवडायला हवी तसेच त्याच्या आवडीप्रमाणे त्याने कोणत्या पूर्व परीक्षा द्यायला हव्यात याचे संपूर्ण मार्गदर्शन केले जाते. इंजिनियर, मेडीकल क्षेत्रासाठी लागणाऱ्या NEET, IIT-JEE, MHT-CET इ. पूर्व परीक्षांची संपूर्ण माहिती तुम्हाला मिळेल. विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी या उपलब्ध सूवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आव्हान कोर्स समन्वयक, डॉ. विकास गवळी, हरिश्चंद्र खरड यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी मोफत करिअर मार्गदर्शणासाठी ९८९०४७६२३७, ९१७५९०९०७५ या नंबरवर संपर्क साधावा अथवा सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते ४:०० या वेळेत एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी कॅम्पस, जनशक्ती जुनियर कॉलेज, केशर गुलाब मंगल कार्यालयाजवळ, आनंदधाम रोड, अ.नगर या ठिकाणी प्रत्यक्ष भेटावे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### मधुमेह आणि पिंपळ

आयुर्वेदात पिंपळाचे झाड औषधी गुणधर्मांचे भांडार मानले जाते. याच्या पानांचा वापर आरोग्याच्या अनेक समस्या दूर करण्यासाठी केला जातो.हे इन्सुलिनची संवेदनशीलता वाढवते आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहे.

## पाककला

### मिक्स व्हेज पराठा

**साहित्य :** दोन कप पीठ, दोन चमचे तेल, एक बटाटा, अर्धा कप किसलेले गाजर, अर्धा कप चिरलेली फुलकोबी, अर्धा कप मटार, अर्धा कप बारीक चिरलेला कांदा, दोन तुकडे केलेल्या हिरव्या मिरच्या, एक इंच किसलेले आले, दोन चमचे बारीक चिरलेली कोथिंबीर, अर्धा टीस्पून धणेपूड, १/२ टीस्पून धने पावडर, १/४ टीस्पून तिखट, १/४ टीस्पून गरम मसाला, १/४ टीस्पून आमसूल पावडर, चवीनुसार मीठ, गरजेनुसार पाणी

**कृती :** एका मोठ्या भांड्यात पीठ घ्यावे. तसेच थोडे मीठ आणि तेल घालून मिक्स करावे. यानंतर पाणी घालून मऊ पीठ मळून घ्यावे. आता पीठ १५ मिनिटे झाकून ठेवा. नंतर कढईत तेल गरम करून त्यात कांदा व हिरवी मिरची घालावी. तसेच आले घालून सोनेरी होईपर्यंत परतवून घ्यावे. यानंतर त्यात वरील भाज्या घालून २ मिनिटे परतून घ्यावे. आता नंतर वरील कोरडे मसाले आणि मीठ घालून मिक्स करावे. उकडलेले आणि मॅश केलेला बटाटा आणि कोथिंबीर घालून मिक्स करावे. यानंतर मळलेल्या पिठाचे छोटे-छोटे गोळे करून लाटून घ्या. नंतर तयार मिश्रण मधोमध भरून त्याची घडी करून पराठा लाटून घ्यावा. आता पराठा तव्यावर तेल लावून दोन्ही बाजूंनी शेकून घ्यावा.

## वास्तू

### पैसा संबंधित समस्यांसाठी

मीठाने भरलेली पिशवी मुख्य दरवाजावर लावल्यास पैशासंबंधीत समस्या दूर होतात. असे केल्याने शुक्र बलवान होतो. या उपायाच्या परिणामामुळे तुमच्या जीवनात सकारात्मक भाव निर्माण होईल. वैवाहित समस्याही दूर होतील. जीवनात समृद्धी येईल.

## सल्ला

गळ्यात चांदीची चेन घातल्याने त्वचेचे आरोग्य चांगले राहते.

## सौंदर्य

मुलतानी मातीत काकडीचा रस एकत्र करुन चेहऱ्याला लावा. याने चेहऱ्यावर तजेला येतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**शनिवार, दि. २८ डिसेंबर २०२४**

**शनिप्रदोष, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, अनुराधा २२।१३, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०६ वा. ०८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आजचा दिवस कठोर परिश्रम करण्यात जाईल.

**वृषभ :** मानसिक सुखशांती मिळेल. कामाच्या ठिकाणी प्रसन्न वातावरण राहील.

**मिथुन :** प्रवासासाठी दिवस उत्तम आहे. मनोरंजनासाठी वायफळ खर्च होईल.

**कर्क :** व्यापार-व्यवसायिकांना दिवस संमिश्र. शत्रूंपासून दूर राहा.

**सिंह :** काळ अनुकूल आहे कामे सहज होतील.

**कन्या :** वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**तूळ :** कामाचा भार अधिक राहील. सहकाऱ्यांशी वाद होतील.

**वृश्चिक :** एखाद्याच्या सहयोगाने कार्ये पूर्ण होतील. देवाण-घेवाण होईल.

**धनु :** आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. आर्थिक उन्नति होईल.

**मकर :** एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात.

**कुंभ :** संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य उत्तम राहील.

**मीन :** आर्थिक नुकसानाची शक्यता आहे. कामांची गती मंदावेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : मी आज असा पदार्थ केलाय की तोंडात टाकताच उकाडा गायब

नवरा : काय केले आहे?

बायको : नवरत्न तेलात भाज्या तळल्या आहेत थंडा थंडा कूल कूल

## जागतिक आश्चर्ये

### अंजार शिल्प

*अंजार हे शिल्प बेरुट पासून ५८ किमीवर उभे आहे. ५ कमानींचे बांधकाम कसेबसे तग धरुन आहे. त्यावेळच्या धनाढ्य समजल्या गेलेल्या लेबनन मधील श्रीमंती थाट दर्शविणाऱ्या आहेत.*

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०८० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ■ | ६ |
| ■ | ७ | | | ■ | ८ | ९ | |
| १० | | | ■ | ११ | | | ■ |
| १२ | | ■ | १३ | | ■ | १४ | १५ |
| १६ | | ■ | | ■ | १७ | | |
| १८ | | ■ | १९ | २० | ■ | ■ | |
| ■ | ■ | २१ | | | २२ | २३ | ■ |
| २४ | | | | ■ | २५ | | |

**आडवे शब्द :-** १) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री - ++++++ चव्हाण ७) भरपूर; खूप; पुष्कळ ८) पराकाष्ठा; पराभव; दुर्दशा १०) कन्येच्या लग्नाच्या वेळी तिला किंवा जावयाला दिली जाते ती गाय वगैरे देणगी ११) महादेवाचे निवासस्थान १२) पिता; तात; जनक १३) वाहनाचे पाय; चक्र १४) पैसा; अडका १६) बोवा; जोगी; तपस्वी १७) या काचेत प्रतिबिंब दिसते; दर्पण १८) ईश्वर; देव; भगवान १९) धरणी; वसुंधरा; पृथ्वी २१) सारख्या स्वभावाचा २४) मनाला येईल तसे वागणे २५) कुठेच न थांबता; थेट; लागलीच

**उभे शब्द :-** २) राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वोच्च नेते ३) यंत्र झिजू नये म्हणून त्याच्या सांध्यात घालतात ते तेल वगैरे ४) किनारा; बाजू; शेवट; अखेर ५) ओळख; वग (नोकरीसाठी वगैरे) ६) महाग नसलेले; सवंग ९) सकस; सत्त्वयुक्त १०) एक देवी ११) कित्येक; कै १३) नोकरी करून उपजीविका करणारा वर्ग १५) अनेक पदार्थांचे सुवासिक मिश्रण जे कालवणासाठी वगैरे वापरले जाते २०) छोटा; लहान २१) पूर्ण भरतीची वेळ २२) थंड; गार; भाताचा दाणा २३) हार; माळ; माला; सर (फटाक्यांची वगैरे)

### शब्दगंध क्र. ७०७९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | हा | न | ता | ■ | हो | का | र |
| ज | ■ | ट | म | ट | म | ■ | ज |
| बू | ■ | व | स | न | ■ | मा | नी |
| त | ग | र | ■ | ■ | प | ला | श |
| ■ | र | ■ | प्र | मा | ण | ■ | ■ |
| सा | ज | ■ | त | ल | वा | र | ■ |
| ल | वं | ग | ■ | क | न | वा | ळू |
| स | त | ल | ज | ■ | क | ळ | ■ |

### फिल्मीचक्कर क्र. ११६९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जो | धा | अ | क | ब | र | ■ | ■ |
| ■ | ■ | मी | ■ | ■ | ■ | भा | दो |
| अ | मी | र | ग | री | ब | ■ | मा |
| ग | ■ | खा | ■ | ■ | न | क | ली |
| र | त | न | ■ | रा | ■ | र्ज | ■ |
| तु | ■ | ■ | ■ | म | न | ■ | बा |
| म | ह | ल | हो | ■ | र | ■ | द |
| न | ■ | ■ | नी | ल | क | म | ल |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : यशस्वी तो असतो जो आपल्या शत्रुंवर नाही तर आपल्या मनावर विजय मिळवतो.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### देशी आणि चायनीज लसणात काय फरक आहे?

तुम्ही पण चायनीज लसूण खात आहात का? हे आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. देशी आणि चायनीज लसूणमधील फरक, त्याचे तोटे आणि भारतात बंदी का आहे ते जाणून घ्या. औषधी गुणधर्मांसाठी प्रसिद्ध असलेला लसूण हा भारतीय स्वयंपाकघराचा अविभाज्य भाग आहे. पण आजकाल बाजारात एक लसूण विकला जात आहे जो आरोग्यासाठी हानिकारक आहे - चायनीज लसूण. अनेक वर्षांपासून बंदी असतानाही भारतीय बाजारपेठेत त्याची बिनदिक्कतपणे विक्री केली जात आहे. चायनीज लसूण का हानिकारक आहे, देशी आणि चायनीज लसूणमध्ये काय फरक आहे याची जिज्ञासा सर्वांनाच आहे.

भारत सरकारने २०१४ मध्येच चिनी लसणाच्या विक्रीवर बंदी घातली होती. यामागील मुख्य कारण म्हणजे त्याचा आरोग्यावर होणारा वाईट परिणाम. चायनीज लसूण खाल्ल्याने पोट आणि आतड्यांमध्ये सूज येण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. चीनमध्ये लसणाची लागवड आणि साठवणूक करताना कृत्रिम पदार्थांचा वापर केला जातो, जो आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. या पदार्थांमुळे अल्सर, इन्फ`क्शन यांसारखे पोटाचे आजार होण्याचा धोका वाढतो. चायनीज लसूण देशी लसणापेक्षा आकारात खूप मोठा असतो. देशी लसणाच्या चार पाकळ्या चायनीज लसणाच्या एका पाकळ्याच्या जवळपास असतात. चिनी लसणाचा रंग पूर्णपणे पांढरा आणि चमकदार असतो, तर स्थानिक लसणाचा रंग मलई किंवा पिवळा असतो.

देशी लसणाच्या पाकळ्या बारीक आणि पातळ असतात, तर चिनी लसणाच्या पाकळ्या जाड आणि उघड्या असतात. देशी लसणाचा वास खूप तीव्र आणि तिखट असतो, तर चायनीज लसणाचा वास फारच कमी किंवा नसतो. देशी लसूण सोलणे थोडे कठीण आहे आणि त्याची साल हाताला चिकटते. त्याच वेळी, चायनीज लसूण सहजपणे सोलले जाते आणि त्याची साल हातांना चिकटत नाही.

स्वस्त असूनही चायनीज लसूण आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. त्यामुळे ती खरेदी करणे टाळावे. देशी आणि स्थानिक लसणाचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर आहे आणि आपण स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन दिले पाहिजे. चिनी लसूण याआधीही भारतात अनेकदा जप्त करण्यात आले आहे, जे त्याच्या अवैध विक्रीचा पुरावा आहे. आपण जागरूक राहून आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.

## चतुराई

दुपारची वेळ होती, राजा अकबर आपल्या दरबारात बसून काहीतरी विचार करत होता. अचानक त्याला बिरबलाने सांगितलेली गोष्ट आठवली. त्याला आठवले की एकदा बिरबलाने त्याला एक म्हण सांगितली होती, ती अशी - खाल्ल्यानंतर पडून राहणे आणि मारल्यानंतर पळणे हे प्रौढ माणसाचे लक्षण आहे.

राजाने विचार केला, आता दुपारची वेळ झाली आहे. बिरबल खाऊन झोपायची तयारी करत असेल. आज त्याचा मुद्दा चुकीचा सिद्ध करूया. असा विचार करून त्याने एका सेवकाला हुकूम दिला की, यावेळी बिरबलाला दरबारात हजर राहण्याचा निरोप द्यावा.

त्यावेळी जेवण करून बिरबल नुकताच बसला होता जेव्हा तो नोकर राजाचा आदेश घेऊन बिरबलाकडे पोहोचला. या आदेशामागे दडलेला राजाचा हेतू बिरबलाला चांगलाच समजला. तो नोकराला म्हणाला, तू थोडा वेळ थांब. मी कपडे बदलून तुझ्यासोबत येतो.

आत जाऊन बिरबलाने स्वतःसाठी एक घट्ट पायजमा निवडला. पायजमा घट्ट असल्याने ते घालण्यासाठी बिछान्यावर पडून राहावे लागले. पायजमा घातल्याचा बहाणा करून तो थोडावेळ पलंगावर पडून राहिला आणि नंतर नोकरासह दरबारात गेला.

दरबारात राजा बिरबलालाच शोधत होता. तिथे पोहोचताच बादशहाने विचारले, का बिरबल. आज जेवल्यावर झोपलो की नाही? बिरबलाने उत्तर दिले, महाराज. आडवा झाला होतो. हे ऐकून राजाला खूप राग आला. त्याने बिरबलाला विचारले, याचा अर्थ तू माझ्या आदेशाचे उल्लंघन केले आहेस का? त्यावेळी तू माझ्यासमोर का आला नाहीस? यासाठी मी तुला शिक्षा करतो.

बिरबलाने लगेच उत्तर दिले, महाराज. मी थोडा वेळ पडून राहिलो हे खरे आहे, पण मी आपली आज्ञा मोडली नाही. तुमचा माझ्यावर विश्वास नसेल तर तुम्ही त्या सेवकाला त्याबद्दल विचारू शकता. होय, हा घट्ट पायजामा घालण्यासाठी मला बिछान्यावर पडावे लागले ही वेगळी बाब आहे. बिरबलाचे हे बोलणे ऐकून अकबर हसल्याशिवाय राहू शकला नाही आणि त्याने बिरबलाला दरबारातून जाऊ दिले.

तात्पर्य - परिस्थिती जाणून चतुराईने घेतलेले एक पाऊल आपल्याला अनेक संकटांपासून वाचवू शकते.

## रहमते दर्शन (भाग - १)



### गुरु की सँभाल

दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की दया का बखान करने से पहले मैं हुजूर के चरणों में आने के बारे में बताना चाहता हूँ। शुरू में मैं हनुमान जी का भक्त था और हनुमान जी की करता था। एक बार जब मैं हनुमान जी की पूजा में तल्लीन था, तो पूजा मुझे हनुमान जी के दर्शन हुए। उन्होंने मुझे बताया,अब मैं इस मृत्युलोक में नहीं हूँ, बल्कि देवलोक में हूँ और देवलोक में गुरु के बग़ैर तुम रह नहीं रह सकते। मैंने अपने इष्टदेव हनुमान जी से उनके साथ रहने की इच्छा प्रकट की थी । इसलिये जब मैंने हनुमान जी से गुरु के बारे में पूछा तो उन्होंने मुझे समझाया कि परमात्मा की ताकत हमेशा किसी न किसी रूप में पृथ्वी पर कार्य करती रहती है। उसी को गुरु कहा जाता है। इस समय यह रूहानी ताकत परम संत दर्शनसिंह जी महाराज के चोले में काम कर रही है। तुम उन्हीं के पास जाओ। २७ जुलाई १९७९ को हनुमान जी के निर्देशानुसार मैं कृपाल आश्रम पहुँचा और महाराज के समक्ष प्रार्थना की और दया की भीख माँगी। २८ जुलाई १९७९ को महाराज जी ने बहुत दया करके नामदान की दात बख़्शी और हमेशा के लिए मेरे अंग-संग रहकर मेरी सँभाल करते रहे। एक बार मैं पुरानी दिल्ली रेलवे स्टेशन से एक चलती हुई गाड़ी में चढ़ने का प्रयास कर रहा था तो मेरा पैर फिसल गया। मैं काफी देर तक चलती गाड़ी के साथ घिसटता हुआ चला गया। जब मुझे यह ख़्याल आया कि अब तो मेरा बचना बहुत मुश्किल है, तो मैंने दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज जी को अपने समक्ष देखा। उन्होंने मुझे अपने हाथों में उठा कर गाड़ी के डिब्बे में बैठा दिया। जब मैंने घूम कर देखा तो महाराज जी वहाँ नहीं थे । मेरे माता-पिता का देहांत बचपन में ही हो गया था। जब मैं बड़ा हुआ तो मेरी शादी हो गई और एक बच्चा पैदा हुआ। मेरा महाराज जी में अटूट विश्वास था। मैंने अपने गाँव हाफिजपुर (जिला फ़ैज़ाबाद) से महाराज जी को चिट्ठी लिखी और बच्चे का नाम रखने के लिए प्रार्थना की। महाराज जी ने वापसी चिट्ठी में मुझे बच्चे को दिल्ली लाने के लिए कहा। मैंने दिल्ली आने में अपनी मजबूरी चिट्ठी में लिख भेजी और महाराज जी से प्रार्थना की कि आप ही आकर बच्चे का नाम रख दें। मेरी प्रार्थना स्वीकार हुई और महाराज जी ने बच्चे का नाम 'फ़िरोजानंद' रखा। ये बच्चा आज भी उनकी दया और कृपा का एक जीवित उदाहरण है । मुझे हर पल, हर घड़ी महाराज जी की उपस्थिति अनुभव होती रहती है। उनकी मीठी याद मेरे दिल में हर वक्त रहती है ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### दिमाग की शक्ती

पीपल के पेड़ को मन में देखते रहें तो आप को उस पेड़ से ऊर्जा मिलती रहेगी। पेड़ पृथ्वी, वायु, सूर्य और जल से जुड़ा होता है। आप को पेड़ के माध्यम से इन तत्वों से भी ऊर्जा मिलती रहेगी। आप किसी गाय को मन में देखते रहें तो गाय से ऊर्जा मिलेगी। गाय की एक विशेषता यह है कि वह चाहे कितनी भी कष्ट में हो उसके दिमाग से सदा सकारात्मक ऊर्जा निकलती रहती है। इसलिए इसे माता का दर्जा दिया गया है। आप किसी देवता, धर्मपिता, पेड़ या गाय को देखें तो कोशिश करके उसके पहले एक बिंदू देखें। यह बिंदू भगवान का रूप माना गया है इस बिंदू के द्वारा आप का मन आप के आराध्य से जुड़ जाता है। निंद्रा जैसा अनुभव करने के लिये कोई भी मन पसंद ईष्ट या अन्य चीजो में से कोई एक को कार्य करते हुए मन ने देखते रहें और निद्रा जैसी अवस्था का अनुभव करें।

दिमाग और विश्वास

विश्वास होगा तो आप क्षितिज पर रोशनी देखेगें। हर निर्माण के पीछे विश्वास होता है। खुद पर विश्वास आप को तब भी चलाता रहेगा जब संसार आप को नीचे गिरायेगा। बादल चाहे कितने भी काले हों तब भी हमेशा सुनहरी लकीर की तलाश करते रहो। सेल्फ हेल्प पुस्तकें पढ़ो, काम में लगे रहो, हमेशा अपने सपने, अपने लक्ष्य पर ध्यान रखो। अगर आप इस वक्त किसी ऐसी जगह पर हो, जो बहुत अच्छी महसूस न होती हो या सुरक्षित न लगती हो तो आप खुद को याद दिलाए कि यह सिर्फ अस्थायी स्थिति है। आप का यही विश्वास असुरक्षा का इलाज है।

भय से मस्तिष्क में एक वायरस पैदा होता है।

मैं किसी पर विश्वास नहीं कर सकता क्योंकि इसने मुझे अतीत में आहत किया, धोखा दिया, निराश किया। अगर दूसरों ने आप को निराश किया है तो इस अनुभव से एक सबक सीखो। कोई एक सकारात्मक चीज क्या करू जो भविष्य में आप को आगे ले जाएं। विश्वास रखें यह संसार आगे बढ़ने का बेहतर मार्ग है ! आगे बढ़ने का मार्ग है दूसरे लोगों के साथ आप के श्रेष्ट संबन्ध। मन में सभी लोगों के साथ श्रेष्ट बोलें, उन्हें सम्मान दे, उन्हें दुआएं दे, धीरे धीरे प्रत्यक्ष में आप जिस के संपर्क में आएंगे वह भी आप को सहयोग देंगे। आस पास के लोगों के प्रति अपने मन में विश्वास रखो। आप की ये मानसिक तरंगे उन्हें वफादार बना देंगी। परिवार और मित्र

अगर आप के शुरुआती संबन्ध खराब रहें हो तो इस के बाद किसी पर विश्वास करना मुश्किल होता है। बच्चा अपने परिवार से दूसरों पर विश्वास करना सीखता है । अत्याचार पूर्ण स्थितियों के शिकार बच्चे अक्सर ऐसे लोग बन जाते हैं, जिन्हें किसी भी चीज या व्यक्ति पर विश्वास करने में बहुत मुश्किल होती है। यदि आसपास के लोग धोखेबाज, अड़ंगेबाज, ईर्ष्यालु हैं तो उस समय किसी महान पुरुष को मन में देखा करो और कहा करो भगवान इनको इस महान पुरुष जैसा, श्री कृष्ण जैसा या इस के ईष्ट जैसा बना दो। आप के यह भाव उन्हें वैसा ही बना देगें। दूसरा आप अपने से छोटों के साथ कभी विश्वासघात नहीं करेगें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### ६ ते ९ महिन्यांतील गर्भवतीचा आहार

सकाळी उठल्यानंतर रोज त्या डब्यामध्ये थोडे फुटाणे, चुरमुरे, भाजलेले शेंगदाणे, ४-५ काळे मनुके, २-३ खजूर, एक अंजीर, दोन ते तीन खारीक व गुळाचा खडा व दोन बदाम व एक काजू असे भरून घ्यावे. ज्या वेळेस भूक लागेल त्या वेळी दोन जेवणांच्यामध्ये, दिवसभरात मधूनमधून थोडेथोडे खाऊन संपवावे. नोकरीनिमित्त बाहेर जाणाऱ्या स्त्रियांना या खाऊच्या डब्याचा खूप उपयोग होतो.

नवनीत घृतक्षीरैः सदा चैनामुपाचेरत् ।।

म्हणजेच लोणी, तूप व दूध हे पदार्थ नेहमी गर्भवतीने खावेत.

गर्भवतीचे कपडे पांढरा, आकाशी, गुलाबी, अबोली, लिंबू अशा फिकट रंगांचे असावेत. या काळामध्ये उलट्यांचा त्रास बराचसा कमी झालेला असतो. गर्भ झटपट वाढीला लागलेला असतो; त्यामुळे गर्भाकडून आहाराची जास्त मागणी होत असते; म्हणून गर्भवतीने मनाला जे आवडेल ते परंतु फक्त घरात तयार केलेले पदार्थ खावेत. दर २-२ तासांनी खात राहावे. पोट भरून जेवण्यापेक्षा थोडे थोडे सारखे खात राहावे. जेवताना नेहमी बाळाचा विचार करावा. आपण जे काही पदार्थ खाणार आहोत ते आपल्या बाळाच्या व स्वतःच्या आरोग्यासाठी उपयुक्त आहेत का? याचा विचार करूनच पदार्थ खावेत. हिरव्या पालेभाज्या, दुधी भोपळा, कोहळा, घोसाळे, पडवळ अशा फळभाज्या, मोड आलेली कडधान्ये, दिवसातून एक किंवा दोन फळे, गाजर, काकडी, टोमॅटो यांची कोशिंबीर करून खावी व भरपूर पाणी प्यावे. या काळामध्ये दररोज एका नारळाचे पाणी प्यावे. फळांमध्ये रोज एक केळ खावे. त्याने बाळाचे वजन वाढण्यास मदत होते. नारळाच्या पाण्यामुळे बाळाभोवतीचे पाणी व्यवस्थित प्रमाणामध्ये राहते. बाकीची आहार योजना पूर्वी सांगितलेल्या पध्दतीप्रमाणेच आहे.

फक्त आहाराचे प्रमाण जास्त ठेवावे. गर्भवतीचा बराचसा त्रासदायक काळ आतापावेतो पार पडलेला असतो; त्यामुळे या काळात संध्याकाळच्या वेळेस बागेमध्ये फेरफटका मारणे. सुवासिक फुलांचा सुगंध घेणे गीत ऐकणे, शास्त्रीयसंगीत ऐकणे यामध्ये मन रमवावे. गर्भवतीने या काळामध्ये होणाऱ्या बाळाशी सुसंवाद साधावा. बाळाला जास्तीत जास्त वेळ द्यावा. पसायदान, मनाचे श्लोक, ज्ञानेश्वरी, भगवद्गीता, मृत्यूंजय यांसारखे ग्रंथ, कादंबरी यांचे वाचन करावे. याचा गर्भावर नक्कीच चांगला परिणाम होतो व बाळाचे विचार देखील प्रगल्भ व चांगले होतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



ध्येय रत्न पुरस्काराने संतोष कानडे सन्मानित करण्यात आले.

## ध्येय रत्न पुरस्काराने संतोष कानडे सन्मानित

नगर – न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्रशासकीय कर्मचारी संतोष पोपटराव कानडे यांना ध्येय रत्न राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

ध्येय उद्योग समूह पुणे संस्थेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान सोहळ्यात पुणे येथील श्रमिक



पत्रकार भवनात झालेल्या कार्यक्रमात त्यांना साहित्यिक रामचंद्र जोरवर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी समूहाचे संचालक लहानू सदगीर, उद्योजक संदिप थोरात, सुनील बेनके, विजय वरुडकर, सौ. सुरेखा कानडे उपस्थित होते.

# घर घर लंगर सेवेच्यावतीने वीर बालदिवस साजरा

नगर – गुरु गोविंद सिंहजी यांचे चार सुपुत्रबाबा अजित सिंहजी, बाबा जुझार सिंहजी, बाबा जोरावर सिंहजी व बाबा फतेह सिंहजी यांच्या शहीद दिनानिमित्त घर घर लंगर सेवेच्या वतीने तारकपूर येथील अन्न छत्रालयात वीर बालदिवस साजरा करण्यात आला. धर्मासाठी बलिदान दिलेल्या चारही शूरवीर बालकांना अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित बालकांनी गीत सादर करुन जो बोले सो निहाल, सत श्री अकाल!... वाहे गुरु जी की खालसा, वाहे गुरु जी की फतेह!....चा जयघोष केला.

**धर्मासाठी शहीद झालेल्या गुरुगोविंद सिंहजी यांच्या चार सुपुत्रांना अभिवादन**



वीर बालदिवस निमित्त आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते बालकांना अल्पोपहार व धर्मासाठी बलिदान दिलेल्या शूरवीर बालकांच्या जीवनावर पुस्तकांची भेट देण्यात आली.

वीर बालदिवस निमित्त आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते बालकांना अल्पोपहार व धर्मासाठी बलिदान दिलेल्या शूरवीर बालकांच्या जीवनावर पुस्तकांची भेट देण्यात आली. याप्रसंगी लंगर सेवेचे जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, जगतीतसिंग गंभीर, राजेंद्र कंत्रोड, मुन्नाशेठ जग्गी, प्रशांत मुनोत, गुलशन कंत्रोड, सुनिल छाजेड, कैलाश नवलानी, सुनिल थोरात, चिंटू गंभीर, कुणाल गंभीर, सोनू गंभीर, सोमनाथ चिंतामणी, मयुर मुलतानी, डॉ. संजय असनानी, राजू जग्गी, सतीश गंभीर, हरभजन धुप्पड, किशोर खुराणा आदींसह समाजबांधव व लंगर सेवेचे सेवादार उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, आजच्या युवकांसह बालकांना शूरवीरतेची प्रेरणा देणारा आजचा दिवस आहे. गुरुगोविंद सिंह यांचे वारसदार असलेल्या लहान मुलांनी धर्मासाठी बलिदान दिले. अल्पावयातच ते शहीद झाले. शीख धर्मावर देखील औरंगजेबने अतिक्रमण केले होते. त्याने चार मुलांना क्रूरपणे शहीद केले. वीर बालकांनी धर्मासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली. वीर बालकांच्या स्मरणार्थ देशात वीर बालक दिन साजरा केला जात आहे. देशभरातील बालकांनी धर्माचा अभिमान बाळगून प्रेरणा घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

हरजितसिंह वधवा म्हणाले की, आपल्या धर्मासाठी कुठल्याही धमकीला भिख न घालता आपले प्राण अर्पण करून सर्वात लहान बालके शहीद झाले. त्यांनी समंजसपणा, निर्भयपणा आणि सिख नेतृत्वाने बनलेल्या अजोड नायकाचे वैशिष्ट्य दर्शविले, आपले आजोबा गुरू तेग बहादूर प्रमाणे त्यांनी धर्म परिवर्तण ऐवजी आपले जीवाचे बलिदान दिले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनक आहुजा यांनी धर्म व सत्यासाठी शीख समाजाने मोठे बलिदान दिले आहे. हे बलिदान व त्याग आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

# श्रीराम विद्यालय आणि अनाहत अ‍ॅकॅडमी आयोजित महोत्सवास प्रतिसाद

नगर – महामहोपाध्याय स्व.डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर आणि ज्येष्ठ तबलावादक, गुरु स्व. पं. विनायकराव थोरात व पद्मविभूषण जगविख्यात तबला वादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संगीत महोत्सवाचे २५ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत रावसाहेब पटवर्धन सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आले होते.



श्रीराम संगीत विद्यालय आणि अनाहत तबला अ‍ॅकॅडमी आयोजित संगीत महोत्सवात सहभागी कलाकार.

या कार्यक्रमाच्या पूर्वार्धात आग्रा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका सौ. कविता खरवंडीकर यांनी शास्त्रीय व अभंग गायनाची मैफल सादर केली. त्यांनी सुरुवातीला राग तोडी घराणेदार पद्धतीने सादर केला. त्यानंतर त्यांनी माझे अंतरीचे तोचि जाणे एक आणि कबीर भजन ठगिनी क्यू नैना छमकावे त्यांना तबल्यावर धनंजय खरवंडीकर आणि संवादिनीवर मकरंद खरवंडीकर तसेच तानपुऱ्यावर वेदांत कुलकर्णी आणि टाळावर किरण जोशी यांनी समर्पक साथसंगत केली. त्यानंतर श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ, पाथर्डी संचलित आनंद म्युझिक अ‍ॅकॅडमी, श्रीराम संगीत विद्यालय आणि अनाहत तबला अ‍ॅकॅडमीच्या सर्व विद्यार्थ्यांचे समूह गायन, स्वतंत्र व समूह तबला वादन, कथक नृत्य, संवादिनी वादन सादर झाले. विद्यार्थ्यांच्या सर्व सादरीकरणाला रसिकांची दाद मिळाली.

सर्व विद्यार्थ्यांना लेहऱ्यावर प्रा. किरण जोशी, संकेत सुवर्णपाठकी, शौनक कुलकर्णी, श्रेया सुवर्णपाठकी, नेहा दरवडे यांनी साथसंगत केली. विद्यालयातील विद्यार्थी कार्तिकस्वामी दहिफळे यांचा सवाई गंधर्व महोत्सवात सलग दोन वर्ष साथसंगत केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी व विद्यालयातील अनेक गुणी विद्यार्थ्यांनी आपले स्वतंत्र वादन सादर केले. यानंतर उत्तरार्धात श्रीराम संगीत विद्यालयाचे संचालक तबला वादक शेखर दरवडे यांचे स्वतंत्र तबला वादन सादर झाले. त्यांनी आपल्या वादनातून रसिकांना खिळवून ठेवले. त्यानंतर आंतरराष्ट्रीय गायक पवन श्रीकांत नाईक यांची राग संगीत व मराठी, हिंदी व ब्रज भाषेतील गीतांची गायन मैफल सादर झाली. कितना सोना तुझे, दहिवाली मी ही गवळण, बाहुली आली हे भारूड, बोबडी गवळण अतिशय उत्कृष्ट सादर केले. त्यांना साथसंगत – कल्याण मुरकुटे व ऋतुजा पाठक (संवादिनी), स्मिता राणा (सतार), कुलदीप चव्हाण (बेंजो), शेखर दरवडे (तबला) सहगायक –मूलांशु परदेशी, राधिका परदेशी, श्रेयस शित्रे, नवरतन वर्मा, पवन तळेकर यांनी साथसंगत केली. निवेदन सुनील कात्रे यांनी केले. माणिक देव आणि प्रचिती सुवर्णपाठकी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राहुरी–पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डीले तसेच नागरदेवळे गावचे सरपंच राम पानमळकर, प्रा. बाळासाहेब खोमणे, धनेश बोगावत, अशोक गांधी, चंद्रकांत पंडित, डॉ. धनश्री खरवंडीकर, आशाताई देशपांडे, कुमुदिनी बोपर्डीकर, श्रीराम तांबोळी, ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे, ह.भ. प.गंगाधर महाराज झाडे, ह.भ.प ज्ञानेश्वर कराळे, ह.भ. प आदिनाथ महाराज बनकर, प्राचार्या सुनीता जामगांवकर, प्रा.अजय महाजन, अ‍ॅड. रवींद्र शितोळे, आदिनाथ शेडाळे, भूषण भणगे, अविनाश देऊळगावकर, श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे शिक्षकवृंद आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.अश्विनी दरवडे, संतोष खोल्लम, वैष्णवी कोल्हे, प्रतीक देवराव, राधिका कोल्हे यांनी परिश्रम घेतले.

# ‘गुंतवणूक जागरूकता’ कार्यक्रमाबाबत नगर सीए शाखेमध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शन

नगर – सीए इन्स्टिट्यूट व रोटरी क्लब डिग्निटीचे यांच्या संयक्त विद्यमाने ७५ व्या स्थापना दिनानिमित्त वर्षभर होत असणाऱ्या उपक्रमांतर्गत गुंतवणूक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





नगर सीए शाखेतर्फे विद्यार्थी, सामान्य गुंतवणूकदार, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक यांना गुंतवणूक करण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

नगर सीए शाखेतर्फे आयसीएआय भवन येथे विद्यार्थी, सामान्य गुंतवणूकदार, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक यांना गुंतवणूक करण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी नगर शाखेचे अध्यक्ष सनित मुथा तसेच रोटरी क्लब डिग्निटीचे अध्यक्ष डॉ. प्रसन्न देवचक्के आणि कार्यकारी सचिव डॉ. अमृता देवचक्के उपस्थित होते.

यावेळी नगर शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा यांनी सर्वांचे स्वागत केले. त्यांनी हा कार्यक्रम घेण्याचा उद्देश स्पष्ट करून गुंतवणूक करण्याचे फायदे, आर्थिक नियोजन यासंदर्भात माहिती दिली.

सीए नगर शाखेतर्फे सीए पवनकुमार दरक यांनी मार्गदर्शन करताना गुंतवणूक करताना कुठल्या क्षेत्रात केली पाहिजे, काय काळजी घ्यायची, कुठल्या घटकांचा विचार करायचा तसेच गुंतवणुकीसाठी कुठले विविध मालमत्ता वर्ग आहेत, दीर्घकालीन गुंतवणूक कशी करायची हे सांगून याचे व्यवस्थापन कसे करायचे, नफा तोटा पत्रक कसे बनवायचे याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाला २०० हून अधिक नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगर शाखेचे उपाध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक, सचिव सीए अभयकुमार कटारिया, खजिनदार सीए महेश तिवारी, माजी अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे यांनी परिश्रम घेतले.



२६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील घनकचरा विभागातील अधिकारी राम साठे सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कचऱ्याचे विविध प्रकार व कचरा कशाप्रकारे विलगीकरण केला जातो, त्याचप्रमाणे कचरा वेगवेगळ्या कसा ठेवायचा, त्याची साठवणूक कशी करायची आणि कचरा गाडीपर्यंत तो कसा पोहोचवायचा याबाबत मार्गदर्शन केले. कचऱ्यापासून काय काय तयार करतात याबद्दलही विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसमवेत माझी वसुंधरा शपथ देखील घेण्यात आली. यात त्यांना अहमदनगर अहिल्यानगर महानगरपालिकेतील घनकचरा विभागाच्या घोरपडे, शुभम पाटील, सुदर्शन अंधारे, ऋषिकेश लांडगे, अभिषेक उमाप यांचे सहकार्य लाभले. प्रसंगीशाळेतील प्रभारी मुख्याध्यापिका गिरमकर मॅडम व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# माउंट लिटेरा झी स्कूल अरणगाव येथे वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

नगर – माउंट लिटेरा झी स्कूल अरणगाव, दौंड रोड, अहिल्यानगर येथे वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संध्या मेढे, सुहास मुळे, आनंद कटारिया, किसनराव लोटके सर उपस्थित होते.



माउंट लिटेरा झी स्कूल अरणगाव येथे वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी संध्या मेढे, सुहास मुळे, आनंद कटारिया, किसनराव लोटके सर आदी.

पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक अध्यक्ष अ‍ॅड. सुनील लोटके यांनी केले. प्राचार्या प्रा. शैलजा लोटके यांनी वर्षभरातील शालेय उपक्रमा अंतर्गत सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, शारीरिक, मानसिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक उपक्रमाविषयी माहिती दिली. १४ एकरांच्या निसर्गरम्य वातावरणात नर्सरी ते दहावीपर्यंतची मुले आनंदाने शिकत असून त्यांचा सर्वांगीण विकास होत आहे.


उद्घाटक आ. संग्राम जगताप यांनी क्रीडा महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांना शपथ देऊन दैनंदिन विद्यार्थी दशेतील खेळाचे महत्व सांगितले. मी स्वतः या शाळेत अनेकदा वेगवेगळ्या तांत्रिक, वैज्ञानिक कार्यक्रमासाठी येत असतो. या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठीच्या दर्जेदार उपयुक्त उपक्रमांमुळे भविष्यातील पिढीला योग्य मार्गदर्शन मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा वेध घेणारी ही शाळा असून प्राचार्या प्रा. शैलजा लोटके यांच्या प्रयत्नातून दिवसेंदिवस प्रगती करीत आहे. शाळेचा कॅम्पस, बिल्डिंग भव्यदिव्य असून, शहरापासून अगदी जवळ असल्यामुळे भविष्यात या संस्थेचा वटवृक्ष होईल, अशा शुभेच्छा दिल्या. पुढील काळातील आव्हानांचा वेध घेऊन ही शाळा त्याप्रमाणे विविध उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबवित असते, याचा मला अनुभव आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण शाळेत शिकणे ही पालक व विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी आहे, असे त्यांनी सांगितले.

संध्या मेढे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शारीरिक, सामाजिक, मानसिक आरोग्याचे महत्त्व समजावून सांगितले. भव्य मैदान, भरपूर झाडे, प्रदूषण मुक्त कॅम्पस, ऑक्सिजनचा भरपूर पुरवठा यामुळे विद्यार्थ्यांची वाढ निकोप पद्धतीने या शाळेत होत आहे. संपूर्ण डिजिटल तंत्रज्ञान, परिपूर्ण लॅब, अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्कृष्ट मार्गदर्शन अशी सर्वांगीण प्रगती साधणारी ही एकमेव शाळा असल्याचे सांगितले या शाळेचे व्यवस्थापन दूरदर्शी, कार्यक्षम असून विद्यार्थी प्रगत व्हावा, अशी तळमळ असणारे आहे. त्यामुळे येथील विद्यार्थी भविष्यातील आव्हानांना यशस्वीरित्या सामोरे जाऊन यश मिळतील, ही खात्री आहे. शाळेतील मैदानी खेळांमुळे मुली समाजात न घाबरता वावरतील.

सुनील लोटके यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# नवजात शिशू न्यूरो क्रिटिकल केअर ट्रेनिंग विषयावर रोटरी सेंट्रलतर्फे २ जानेवारी रोजी आंतरराष्ट्रीय परिषद

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या वतीने लोणी येथील डॉ. बाळासाहेब विखे पाटील रूरल मेडिकल कॉलेजमध्ये २ जानेवारी २०२५ रोजी नवजात शिशू न्यूरो क्रिटिकल केअर ट्रेनिंग विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञ या परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत. जनरल प्रॅक्टिशनर, स्त्री रोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, नवजात शिशू विकार तज्ज्ञ, सर्जन, सोनोग्राफी तज्ज्ञ अशा सर्वांनाच नवीन संशोधन व अत्याधुनिक उपचार पद्धतीची माहिती या कार्यक्रमातून होणार आहे.



रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, रोटरी क्लब ऑफ शॉर्लेट हॉल (अमेरिका), प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स (अभिमत विद्यापीठ), डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे मेडिकल कॉलेज, अहमदनगर ॲकॅमी ऑफ पेडियाट्रिक्स, इंडियन अ‍ॅकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने ही आतंरराष्ट्रीय परिषद होत आहे. २ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता परिषदेचे उद्घाटन होईल. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोटरी को ऑर्डिनेटर झोन ७ चे डॉ. दीपक पुरोहित, कुलगुरू डॉ. राजेंद्र विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर स्वाती हेरकल, डॉ. संजय पाखमोडे – अध्यक्ष (एमएएचएआयएपी), प्रा. डॉ. अभिजीत दिवटे, डॉ. राहुल कुंकुलोळ, डॉ. अमोल पवार जनरल सचिव (एमएएचएआयएपी) आदी उपस्थित राहणार आहेत.

नवजात शिशूला ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे अनेक आरोग्य समस्या निर्माण होतात. विशेषत: मेंदूला रक्तपुरवठा कमी झाल्यास गुंतागुंत निर्माण होते. अशावेळी तातडीने आवश्यक तपासणी व निदान करून उपचार महत्वाचे असतात. या परिषदेत याच अनुषंगाने अत्याधुनिक उपचाराचे ट्रेनिंग मिळणार आहे. रोटरी सेंट्रलच्यावतीने सामाजिक जाणीवेतून आरोग्य क्षेत्रात भरीव कार्य केले जात आहे. विशेषतः गर्भवती माता, लहान मुलांच्या आरोग्यासाठी अनेक चांगले उपक्रम राबविले जातात. आताच्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी रोटरी फाऊंडेशन अंतर्गत ग्लोबल ग्रॅण्ट जीजी २४६०४५२ यांचे सहकार्य लाभले आहे.

या परिषदेसाठी राज्य तसेच देशातून डॉक्टर्स येणार आहेत. आंतरराष्ट्रीय परिषदेची नियोजन व्यवस्था समिती सदस्य पीडीजी शिरिष रायते, हरिष नय्यर, डॉ. एस. व्ही. जोशी, डॉ. कुणाल कोल्हे, प्रसन्ना खाजगीवले, उमेश रेखे, सुनील कटारिया, डॉ. सचिन वाहाडणे, डॉ. गणेश माने, चेतन अमरापूरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. उज्वला शिरसाठ, मनीष बोरा, गणेश शाह, अमर गुरप, हितेश गुप्ता यांच्यासह रोटरीचे सर्व पदाधिकारी पाहत आहेत.

अधिक माहिती व परिषदेत सहभागी होण्यासाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधा –८९७५१११५१, ९९२३३८७२७२.

# घरासमोर लावलेल्या होंडा कंपनीच्या मोटारसायकलची चोरी; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – घरासमोर रस्त्याच्या कडेला लावलेली हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल (क्रमांक एम एच १७ जे ८५ ४७) अज्ञात चोरट्याने नजर चुकवून हॅण्डेल लॉक तोडून बनावट चावीने सुरू करून चोरून नेली. ही घटना नगर मनमाड रोडवरील नागापूर परिसरातील चेतना कॉलनी येथील कानिफनाथ मंदिराजवळ घडली.

याबाबत एमआयडीसी पोलिसांनी संजय मारुती औटी (वय ५२, कानिफनाथ मंदिराजवळ चेतना कॉलनी, नागापूर, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बी एन एस २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली अधिक तपास पोलीस हवालदार शेख करीत आहे.



गुरु दत्त भक्तीधाम मंदिरात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला.

# श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास गुरु दत्त भक्तीधाम मंदिरामध्ये प्रारंभ

नगर – भगवान श्री कृष्ण स्वरुप महापुण्यमय पवित्र मार्गशीर्ष मासनिमित्त श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा निमित्त २४ ते ३० डिसेंबर या कालावधीत पाईपलाईन रोड येथील किसनगिरीनगर येथील गुरुदत्त भक्ती धाम मंदिरात पारायण सोहळा होणार आहे. श्री संत किसनगिरी बाबा महिला भजनी मंडळ, समस्त गीता साधक परिवार व श्री संत किसनगिरी बाबा नगर भक्त मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पारायण सोहळ्याचे श्री संत किसनगिरीबाबानगर व पंचक्रोशीतील समस्त भाविकांनी व माता भगिनींनी श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पारायणाची वेळ दररोज दु.१२:०० ते ४:००, दु.१२:०० वा. श्री विष्णुसहस्रनाम, गीता पाठ व हरिपाठ सायं. ४ ते ५ या वेळेत होणार आहे. ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली शिंदे, गुरुजी हे पारायणाचे निरुपण करणार आहे. ३० डिसेंबर रोजी ज्ञानेश्वरी पारायण सांगता, दु.३:३० ते ५:३० ग्रंथ पूजन, ग्रंथ दिंडी मिरवणूक व हरिपाठ होईल. सायंकाळी–५:३० ते ७:०० दीपोत्सव,आरती व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.




मंत्री परिवाराने स्वखर्चाने केलेल्या फरशी कामाच्या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन आमदार मोनिकाताई राजळे व महंत नामदेव महाराज शेकटेकर यांचे हस्ते झाले.

# मंत्री परिवाराने स्वखर्चातून निर्माण झालेले भवन गावाच्या हिताचे ठरणार

## आ. मोनिकाताई राजळे यांचे प्रतिपादन

हातगाव – सार्वजनिक जिवनात जिवन जगत असताना प्रत्येक नागरिक वेगवेगळे पद्धतीने आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळून आपले नाव लौकिक करण्याचा प्रयत्न करत असतात मात्र आज हातगावात मंत्री कुटुंबियांकडून संस्कृतिक भवनासाठी जो निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तो निश्चितच इतरासाठी प्रेरणा देणारा असून असेच मोलाचे काम इतर दानशूरांनी करावे कारण या मधून आदर्शव्रत असा संदेश जनतेपुढे जात असल्याचे मत आमदार मोनिकाताई राजळे यांनी व्यक्त केले आहे.

शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील गावचे रहिवाशी व अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे सेवानिवृत्त कार्यकारी संचालक रामसूख मंत्री यांनी स्वखर्चातून त्यांचे वडील स्व. दामोदर गोपालदास मंत्री पुण्यस्मरणार्थ जे संस्कृतिक भवन उभे केले तसेच स्वर्गीय मातोश्री सौ. राजेश्री रामसुख मंत्री यांच्या पुण्यस्मरणार्थ योगेश व रूपेश मंत्री यांनी स्वखर्चाने केलेल्या फरशी कामाच्या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन आमदार राजळे व महंत नामदेव महाराज शेकटेकर यांचे हस्ते झाल्यानंतर कार्यक्रमात आ.राजळे बोलत होत्या.

ते भविष्यात गावातील गोरगरीब जनतेच्या अनेक सार्वजनिक कामासाठी हे भवन हिताचे ठरणारे असल्याने त्याची देखभाल व दुरुस्ती गावकऱ्यांनी सतत करत राहिल्यास त्याचा अनेक काळ वापर होईल असे सांगून आ. राजळे म्हणाल्या की, जिल्हा सहकारी बँकेचे संस्थापक स्व. भाऊसाहेब थोरात यांचेपासून मंत्री यांनी क्लर्क पासून ते कार्यकारी संचालक या पदापर्यंत बँकेचे व जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कायम हीत राखून काम केले असल्याने सेवानिवृत्तीनंतरही त्यांना काही काळ बढती देऊन काम करण्याची संधी मिळालेली असून सेवानिवृत्ती होईपर्यंत जेवढे संचालक मंडळ अस्तित्वात होते त्या सर्वाकडून मंत्री यांच्या कामाचा आदर्श कार्यकारी संचालक म्हणून सन्मान झालेला आहे असेही आमदार राजळे यांनी सांगितले आहे.

कार्यक्रमास मंत्री परिवारातील पुणे, नगरसह अनेक ठिकाणचा परिवार व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायतकडून सदस्य डॉ. निलेश मंत्री, प्रा. भाऊसाहेब मुरकुटे व ग्रामविकास अधिकारी संजय दारुणकर यांनी मंत्री यांचा सत्कार केला आहे.

# शहरात २९ डिसेंबरला मातंग समाजाचा मोफत वधू-वर पालक परिचय मेळावा



नगर – येथील प्रतिबिंब सामाजिक संस्थेच्या वतीने मातंग समाजाचा मोफत वधू–वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि.२९ डिसेंबर) रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत सावेडी, भिस्तबाग रोड येथील सोनापार्कमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. तर यावेळी समाजात विविध क्षेत्रात निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींना लहु रत्न गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. या मेळाव्यात समाज बांधवांना सहभागी होण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

अर्जुनराव बोरुडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमासाठी आमदार जितेश अंतापूरकर, कॉन्ट्रॅक्टर बाळकृष्ण जगधने, लक्ष्मीकांत भालेराव उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्रातील मातंग समाज मोठ्या प्रमाणात नोकरी उद्योग धंदे– व्यवसाय व इतर कारणाने ग्रामीण भागातून शहरात आले असल्याने समाज विखुरला गेला आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून समाज एकवटणार असून, वधू–वर पालक परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील युवक –युवतींचे लग्न जमविण्याचे प्रयत्न केले जाणार आहे. योग्य व अनुरूप असा जोडीदार निवडण्यासाठी संस्थेच्या वतीने वधु वर परिचय मेळाव्याचे दरवर्षी आयोजन केले जाते. मातंग जातीतील हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध, जैन व इतर धर्मियांचा सहभाग असतो. या मेळाव्यास संपूर्ण राज्यातून मातंग समाजबांधव उपस्थित राहणार असल्याची माहिती संस्थेचे मार्गदर्शक भगवान जगताप यांनी दिली.

या वर्षीचे लहु रत्न गौरव पुरस्कार उत्तमराव शेलार, ईश्वर गायकवाड, दिनकरराव लांडगे, किशोर बावणे, नंदकुमार सोनवणे, डॉ. भालेराव, गुलाबराव मिसाळ, राजू घाटगे, भारत पवार, नारायण डोलारे, डॉ. रवी खडसे, बाळासाहेब वैरागर, दिनकरराव सकट, मनोज उल्हारे, मंगलताई दावने, विनोद वैरागर, संजयराव पोटफाडे, बाळासाहेब गायकवाड, मनोहर आरणे, राहुल खडसे यांना जाहीर झाले आहे. प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये सदर पुरस्कार्थींना सन्मानित केले जाणार आहे.

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष दादू नेटके, उपाध्यक्ष संजय मंडलिक, सचिव अनिल जगताप, नामदेव रोकड, भास्कर अडागळ, भरत उमाप, शरद काळोखे, विजय वावरे, रवींद्र जगताप, बाबासाहेब शेलार, डॉ. सुनील साठे प्रयत्नशील आहेत.

मेळाव्यासाठी कोणत्याही प्रकारची फी अथवा शुल्क आकारले जाणार नसून, माहितीसाठी दादू नेटके ९२७२५१३०७१ व अनिल जगताप ९९२२७१४३५३.

## लतीका घुले यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर



नगर – संगमनेर येथील सेवानिवृत्त शिक्षिका लतीका जिजाबा घुले यांना महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार ५ जानेवारी २०२५ रोजी बारामतीच्या पद्मश्री आप्पासाहेब पवार सभागृहात देण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष एन.डी. मारणे यांनी दिली.

लतीका घुले यांची नाशिक विभागातून ही निवड झाली आहे. सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यांना यापूर्वी १९९९मध्ये राज्य सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला होता. त्यांनी संगमनेर नगरपालिकेच्या शाळेत प्राथमिक शिक्षिका म्हणून काम केले. त्या प्राथमिक शिक्षक बँकेच्या काही वर्षे संचालिकाही होत्या. प्राथमिक शिक्षकांच्या राज्य संघटनेतही त्या पदाधिकारी होत्या. विविध सामाजिक उपक्रमांत त्या सहभागी असतात. पेन्शनर्स संघटनेकडून अनेक सेवानिवृत्तांचे प्रश्न सोडवले.

महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचा राज्यस्तरीय मेळावा ५ जानेवारीला सकाळी १०.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चालणार आहे. या मेळाव्यात जीवन गौरव व निवृत्त सेवा पुरस्कारांचे वितरण होईल. लतीका घुले व मधुकर साबळे यांची उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यातून जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. मधुकर रामजी साबळे हे नंदुरबार येथील आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागातून मोहम्मद मिराखान नबीरखान, अमरावती विभागातून प्रमोद अनंतराव पातुरकर, नागपूर विभागातून वामनराव सदनजी जुआरे व रामराव श्रावण सोयाम यांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे.

# जेएसएस गुरुकुलने विद्यार्थ्यांना दाखविला संभाजी महाराजांच्या जीवनावरील सिनेमा

### सिनेमातून विद्यार्थ्यांनी अनुभवला पराक्रम

नगर – स्वराज्यासाठी बलिदान देऊन पराक्रमाचा इतिहास गाजविणारे छत्रपती संभाजी महाराजांचा ज्वाजल्य इतिहास ज्ञात होण्यासाठी संभाजी महाराजांच्या जीवनावर सिनेमा शालेय विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. केडगाव, मोहिनीनगर येथील जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जेएसएस) स्कूलच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी दिलेला लढा, अनेक युध्दात मिळवलेला विजय, अंगावर शहारे आणणारे विविध घटना व अष्टपैलू व्यक्तीमत्वाचा थरारक अनुभव सिनेमातून घेतला.



जेएसएस गुरुकुलच्यावतीने दाखविण्यात आलेला संभाजी महाराजांच्या जीवनावरील सिनेमा पाहताना विद्यार्थी.

कोहिनूर मॉल येथील सिनेमागृहात स्कूलचे प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमास शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

निकिता कटारिया म्हणाल्या की, छत्रपती संभाजी महाराजांनी आठ–नऊ वर्षांच्या कार्यकाळात एकूण १२० युद्धे लढली व सर्वच्या सर्व युध्दात विजय मिळवला. असा पराक्रम करणारे संभाजी महाराज हे एकमेव योध्दे होते. त्यांनी स्वराज्यासाठी दिलेला लढा सर्वांसाठी स्फुर्ती देणारा आहे. त्यांच्या संघर्षापासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने विद्यार्थ्यांना सिनेमा दाखविण्यात आला.

शाळेत शिक्षणासह विद्यार्थ्यांवर महाराष्ट्राची संस्कृती व संस्कार रुजविण्याचे कार्य केले जात आहे. मोबाईलमध्ये गुंतलेल्या मुलांना बाहेर काढण्यासाठी विविध उपक्रम शाळेत सुरु आहे.

# जिल्हा न्यायालयाचा २०० वर्षांचा वैभवशाली इतिहास जतन करा

## न्यायाधीश अंजू शेंडे यांचे प्रतिपादन; बार असोसिएशनच्यावतीने न्यायाधीश व वकिलांना द्विशताब्दी सोहळ्याच्या स्मरणिकेचे वितरण

नगर – जिल्हा न्यायालयाचे द्रीशताब्दी वर्ष व सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करून बार असोसिएशनने उत्कृष्ट काम केले आहे. त्यानिमित्त संवेदनशीलतेने काढलेली ही स्मरणिका संस्मरणीय, वाचनीय व पुढील पिढ्यांना मार्गदर्शक आहे. जिल्हा न्यायालयाचा २०० वर्षांचा वैभवशाली इतिहास हा सतत वाचला जाऊन जतन केला गेला पाहिजे. यासाठी वकील संघटनेने काम करावे, असे प्रतिपादन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.



जिल्हा न्यायालयाच्या द्विशताब्दी निमित्त काढण्यात आलेल्या विशेष स्मरणिकेचे वितरण प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांना देताना वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.नरेश गुगळे.

जिल्हा न्यायालयास २०० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने गेल्या ऑगस्ट महिन्यात एका खास दिमाखदार सोहळ्याचे आयोजन नगरमध्ये केले होते. या यानिमित्त काढण्यात आलेल्या विशेष स्मरणिकेचे वितरण न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते न्यायाधीश व वकिलांना मंगळवारी झाले. यावेळी जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, केंद्र सरकारचे वकील सुभाष भोर, वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.नरेश गुगळे व सचिव ॲड.संदीप शेळके आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष राजेश कातोरे, उपाध्यक्ष वैभव आघाव, सचिव संदीप बुरके, असोसिएशनचे पदाधिकारी, न्यायिक अधिकारी व वकील उपस्थित होते.

प्रास्ताविकात ॲड.नरेश गुगळे म्हणाले, १८२३ साली स्थापना झालेल्या ऐतिहासिक जिल्हा न्यायालयाचे द्विशताब्दी वर्ष सर्वांच्या सहकार्याने व सहभागाने मोठ्या उत्साहात साजरे झाले आहे. यासाठी बऱ्याच हातांनी मदत केली. न्यायालयाच्या २०० व्या वर्षपूर्ती निमित्त जुन्या इतिहासाचे वर्णन असलेली २०० पानांची स्मरणिका प्रकाशित करण्यात आली आहे. या स्मरणिकेत वकील व न्यायाधीशांचे विविध विषयांवरील लेख, वकील खासदार असलेले स्व.उत्तमचंद बोगावत व स्व.भाऊसाहेब कानवडे यांच्या वरील लेख, सर्वांना कायम मार्गदर्शन करणरे स्व. जी. जी. खान, ॲड. मेहेर यांच्यासारख्या जुन्या वकीलांच्या कार्यावर लेख यासह विविध उपयुक्त माहितीचा या स्मरणिकेत समावेश आहेत. ही स्मरणिका नव्या वकिलांना मार्गदर्शक ठरेल. कालच बार असोसिएशनच्या नव्या पदाधिकाऱ्यांची निवड झाली आहे. चांगले काम करणारे पदाधिकारी या निवडणुकीत निवडून आल्याने बारचे काम चांगले चालणार आहे,

या स्मरणिकेसाठी मुख्य संपादक अभय राजे, गौरव दांगट, सुयोग गुगळे, नितीन खैरे, रामेश्वर काराळे यांनी स्मरणिकेसाठी योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभय राजे यांनी केले, सचिव ॲड. संदीप शेळके यांनी आभार मानले. यावेळी बार उपाध्यक्ष ॲड. महेश शेडाळे, महिला सहसचिव ॲड. भक्ती शिरसाठ, खजिनदार ॲड. शिवाजी शिरसाठ, सह सचिव ॲड. संजय सुंबे, कार्यकारणी सदस्य ॲड. अमोल अकोलकर, ॲड. सारस क्षेत्रे, ॲड. विनोद रणसिंग, ॲड.देवदत्त शहाणे, ॲड.शिवाजी शिंदे, ॲड.रामेश्वर कराळे, ॲड. अस्मिता उदावंत आदींसह माजी पदाधिकारी, वरिष्ठ वकील व वकील व महिला वकील उपस्थित होते.

# विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना कागदपत्र सादर करण्याचे आवाहन


नगर – विशेष सहाय्य योजनेतील संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थींना फेब्रुवारी–२०२५ पासून डी. बी. टी द्वारे अर्थसहाय्याचे वितरण करण्यात येणार असून लाभार्थ्यांनी ३१ डिसेंबर पर्यंत संबंधित तलाठी यांचेकडे आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन पारनेर तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी केले आहे.

लाभार्थ्यांनी बँक खाते आधारकार्डशी संलग्न करून बँक खाते पुस्तकाची छायांकीत प्रत सादर करावी. सोबत आधारकार्डची छायांकीत प्रत, दिव्यांग प्रमाणपत्र लागू असल्यास त्याची छायांकीत प्रत सादर करावी. अद्ययावत मोबाईल क्रमांक बँक खात्याशी संलग्न असणे बंधनकारक आहे.

लाभार्थींची मुले खाजगी, निमसरकारी, शासकीय सेवेत असल्यास किंवा आर्थिक परिस्थिती सधन असल्यास अशा लाभार्थीने स्वतःहून लाभ सोडावा. कागदपत्रे सादर न करणाऱ्या ई–केवायसी न करण्याऱ्या लाभार्थीचे अनुदान बंद झाल्यास त्यास संबंधीत लाभार्थीच जबाबदार राहतील, असेही कळविण्यात आले आहे.

### सामाजिक सेवेचे व्रत घेतलेला महामानव

# युनिव्हर्सिटीचे कुलगुरु पी. ए. इनामदार



निसर्गाने पृथ्वी तलावर अनेक रत्नं, माणकं आणि हिरे विखुरले आहेत. असाच एक मौल्यवान हिरा २८ डिसेंबर १९४५ रोजी अब्दुल रझाक इनामदार आणि ताहीरुन्नीस्सा इनामदार यांचे घरात, दयावान अल्लाच्या कृपेने अवतिर्ण झाला. आपण आपल्या कार्यकर्तुत्वाचा ठसा आपल्या कर्तव्यापारायण कार्य कौशल्याने विविध क्षेत्रात उमटविला, मग ते क्षेत्र स्थापत्यशास्त्र असो, ते क्षेत्र पवित्र शिक्षणाचे असो ते क्षेत्र सामाजिक सेवेच्या विचारधाराचे असो, की अर्थतज्ञ म्हणून असो ते क्षेत्र उत्तम वक्त्याचे असो की दातृत्वाचे. ते क्षेत्र धर्मांच्या तौलनिक अभ्यासाचे असो की कर्तृत्वसंपन्न पुत्र म्हणून! साहेब, आपण ज्या ज्या क्षेत्रात गेलात त्या त्या क्षेत्रात आपण आपली नाममुद्रा उमटविली. आपण आहुरा बिल्डर्सचे प्रोप्रायटर तर पुण्याच्या प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष, आपण इस्लामिक डेव्हलपमेंट बँक, जद्दाह यंदाच्या पश्चिम विभाग निमंत्रकपदी आहात. नवी दिल्लीच्या उर्दू भाषेच्या उन्नत्तीसाठी असलेल्या एनसीपीयुएलचे आपण सदस्य आहात. मॅनेजिंग डायरेक्टर ब्रॅडबेरी हॉटेल–यु.के., चेअरमन– दी मुस्लिम को–ऑप बँक लि, –पुणे, मेंबर – मॅनेजमेंट कौन्सिल अलिगढ मुस्लिम युनिर्व्हसिटी, शैक्षणिक क्षेत्रात डझनभर संस्थाचे आपण आद्य संस्थापक, प्रवर्तक, विश्वस्त आहात.

समाजसेवा हे आपले क्षेत्र, आपण दिल्लीच्या जामिया मिलिया विद्यापीठाचे सिनेट सदस्य आहात. मुंबई, पुण्यातील यतिमखाना संस्थेचे विश्वस्त आहात. आपल्या विधीज्ञानास पदवीचे कुंपण नसल्याने चतुस्त्रता आणि ज्ञानलालसा यामुळे कायद्याच्या ज्ञानाचा लाभ अनेक व्यक्तींपासून संस्थांपर्यंत लाभप्रद ठरला आहे. साहेब, आपल्या ओघवत्या वक्तृत्व शैलीचा, ज्ञानगर्भित अमोध वाक्यचातुर्याचा श्रवणानंद म्हणजे श्रोत्यांना पर्वणीच! संपूर्ण देशात शैक्षणिक संस्था, दवाखाने, अनाथालये, उभारताना आपण आपल्या दातृत्वाचा वारसा जपलाय माता–पित्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी त्यांच्या नावाने विजापूर, पुणे येथे आपण शैक्षणिक संस्था उभारल्या. ६ कोटी ते ६०० कोटी आणि ५ शाखा ते २७ शाखा हा पुणेस्थित मुस्लिम को–ऑप बँकेचा प्रवास आपल्याच मार्गदर्शनाखाली झाला. मुस्लिम समाजाचा चेहरा आपणामुळे अधिकाधिक समाजोमुख झाला. निवास किंवा नोकरी व शिक्षण ही प्रत्येक मुस्लिम कुटूंबाला आपणामुळे प्राप्त झालेली संजीवनी आहे.

आझम कॅम्पस म्हणजे आपल्या उत्तुंग शैक्षणिक कार्यकतृत्वाचा हिमालय! पूर्व प्राथमिक ते पदवीपर्यंत शिक्षण देणारी ही कामधेनू! आपल्याच कार्यकाळात पुण्यातील दी महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटीन एज्युकेशनल सोसायटीला अत्यंत मानाचा समजला जाणारा मौलाना अब्दुल कलाम आझाद साक्षरता सन्मान मिळाला. परिसर बँकेचा असो की शैक्षणिक संस्थेचा आपल्या निसर्ग जगवा या संकल्पनेतून तो हिरवागार झाला समृद्धी अशी भरभरुन सर्वत्र ओसंडत आहे. आपला विश्वास आत्मसन्मान, समर्पण, ध्येयनिष्ठा, द्रष्टेपणा, आपुलकी आणि निर्माण केलेली प्रत्येक संस्था मायेच्या ममतेने आपण जोपासली आहे. आपल्या वानप्रस्थाश्रमात आपणास उदंड काय मागावे त्या अल्लाकडे? आपणाकडे सारे आहेच फक्त आपण लावलेल्या या रोपट्यांचे वटवृक्षात झालेले रुपांतर पाहण्यासाठी अल्लाह आपल्याला देवो आरोग्य संपन्न शतायुषी जीवन! आणि आपणास सतत मिळत राहो सर्वांचे कृतानेक प्रेम, अकृत्रिम प्रेम! आमिन!

**– इंजि.इकबाल सय्यद**

# दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरीता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू

नगर – दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरिता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू करण्यात येत असून इच्छुक अर्जदारांनी ३१ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहीत शुल्काच्या धनाकर्षासह अर्ज रोखपाल विभाग खिडकी क्रमांक २० येथे जमा करण्याचे आवाहन श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत जोशी यांनी केले आहे.

अर्ज सादर करताना वाहन नावावर असलेल्या व्यक्तीच्या नावाच्या अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड, आधार कार्डला संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांक धनाकर्ष उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीरामपूर याचे नावे असणे आवश्यक आहे.

एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज आला असेल त्यांची व एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आले असतील त्यांच्या पसंती क्रमांकाची यादी ३१ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल. एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोन पेक्षा जास्त अर्ज आलेल्या यादीमधील पसंती क्रमाकांसाठी ज्यांनी अर्ज केला आहे, अशा अर्जदारांनी १ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता पसंती क्रमांक शुल्काच्या धनाकर्षाव्यतिरिक्त जादा रक्कमेचा धनाकर्ष बंद लिफाफ्यात सिलबंद करून उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात उपस्थित राहावे.

चारचाकी परिवहनेत्तर (खाजगी) वाहनांच्या आकर्षक क्रमांकासाठी परिवहनेत्तर चार चाकी वाहन असणाऱ्या शुल्काच्या तीन पट शुल्क भरुन नवीन मालिकेतील आकर्षक क्रमांक आरक्षित करता येतील. मालिकेतील एकाच क्रमांकासाठी दुचाकी वाहन व चारचाकी वाहन यांसाठी अर्ज प्राप्त झाल्यास, सदर क्रमांक दुचाकी अर्जदार व चारचाकी अर्जदार यांपैकी ज्या अर्जदाराची एकूण रक्कम जास्त असेल अशा अर्जदारांना देण्यात येईल.

वाहन क्रमांकाला अंतिम मान्यता मिळण्यापुर्वी पसंती क्रमांक शुल्कात वाढ झाल्यास जादा वाढ झालेली रक्कम वाहन मालकाला भरणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी. आकर्षक क्रमांकासाठी विहित केलेल्या शासकीय शुल्काबाबतची माहिती उप प्रादेशिक परिवहन कार्यालय श्रीरामपूर येथे खिडकी क्रमांक २० वर प्रदर्शित करण्यात आलेली आहे. पसंती क्रमांक शुल्क भरतांना वितरकांच्या स्तरावर वाहन नोंदणी करतांना आधार क्रमांकाशी जोडलेला भ्रमणध्वनी क्रमांक आवश्यक असल्याने सदर भ्रमणध्वनी क्रमांकच पसंती क्रमांकाच्या अर्जावर नमुद करावा. दूसरा भ्रमणध्वनी नोंदविल्यास वाहन नोंदणी वेळी अडचण निर्माण होऊ शकते याची वाहनधारकांनी नोंद घ्यावी असेही कळविण्यात आले आहे.

# राष्ट्रभाषा परीक्षेत श्री रामकृष्णचे सुयश

नगर – प्रतिवर्षीप्रमाणे सन २०२४–२५ मध्येही महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे यांच्यातर्फे आयोजित केलेल्या परीक्षेत श्री राम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले आहे. यावर्षी राष्ट्रभाषा बालबोधिनी परीक्षेत परेश गौरव हरबा हा विद्यार्थी प्रथम आला. तसेच राष्ट्रभाषा प्राथमिक परीक्षेत अर्णव विशाल पारे हा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. राष्ट्रभाषा प्रवेशिकामध्ये सिद्धी मुकेश पल्लोड ही विद्यार्थिनी प्रथम आली तर राष्ट्रभाषा सुबोध मध्ये रिया सुमित लखारा ही प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.



रिया लखारा सिद्धी पल्लोर अर्णव पारे परेश हरबा

वरील सर्व परीक्षांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेसाठी विद्यालयातील शिक्षक सौ. रोथेल लोंढे व सौ. कल्याणी टिक्कल यांनी मार्गदर्शन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना व राजेश झंवर, संस्थेचे सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर, उपप्राचार्या संपदा देशपांडे, समन्वयक सुषमा उजागरे, श्रेयकुमार गुंडू यांनी अभिनंदन केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## सहा मेंदूंचा प्रयोग

जगभरात काही भन्नाट प्रयोग केले जात असतात. वेगवेगळे कॉम्प्यूटर लॅन किंवा इंटरनेटने एकमेकांना जोडले जातात हे आपल्याला माहिती आहेच. मात्र, मानवी मेंदूही असेच एकमेकांना जोडता येतात, हे काही वर्षांपूर्वी अमेरिकेतील एका अनोख्या प्रयोगात दाखवून दिले होते. भारतीय वंशाच्या एका संशोधकाच्या नेतृत्वाखाली दोन व्यक्तींचा संपर्क मेंदूमार्फत साधण्यात आधी यश आले होते. त्यात दुसरी व्यक्ती पहिल्या व्यक्तीच्या हाताच्या हालचालींचे, विचारांचे नियंत्रण करू शकते. पुढे हा प्रयोग सहा व्यक्तींमध्येही यशस्वी करण्यात आला. तसा दावा भारतीय वैज्ञानिक राजेश राव यांनी केला होता. ते वॉशिंग्टन विद्यापीठातील संगणक विज्ञान व अभियांत्रिकीचे सहायक प्राध्यापक आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन झाले आहे. वॉशिंग्टन विद्यापीठातील वैज्ञानिकांनी दोन व्यक्तींना मेंदूमार्फत जोडले. त्यानंतर सहा व्यक्तींमध्ये हा प्रयोग करताना संशोधकांनी एका व्यक्तीच्या मेंदूतील संदेश इंटरनेटला दिले व नंतर त्यांच्या मदतीने दुसऱ्या व्यक्तीच्या हाताच्या हालचालींचे नियंत्रण ते संदेश पाठवून केले. दोन व्यक्तींच्या मेंदूतील जोडणी आता उपयोगी तंत्रज्ञानात रूपांतरित झाले असून, त्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले, असे संशोधनाच्या सहलेखिका अँड्रिया स्टॉको यांनी सांगितले. त्या मानसशास्त्राच्या सहायक प्राध्यापक आहेत.

राजेश राव यांनी, शरीराला कुठलाही छेद न देता केवळ बाह्य? मार्गाने यंत्रांचा वापर यात केला व दोन व्यक्तींसाठी मेंदू जोडणारी आज्ञावली तयार केली. दोन व्यक्तींना मेंदूच्या मदतीने जोडण्याची ही प्रक्रिया सरळ आहे, त्यात गुंतागुंत नाही. एक व्यक्ती इलेक्ट्रोएनसेफलोग्राफी मशिनला जोडली जाते व ती मेंदूच्या क्रिया वाचते. त्यामुळे विद्युत संदेश वेबमार्फत दुसऱ्या सहभागी व्यक्तीकडे पाठवतात. त्या व्यक्तीने पोहण्याची टोपी घातलेली असते, त्यात मेंदूजवळ असलेल्या भागाशी चुंबकीय उद्दीपन कॉईल असते, त्यामुळे हातांची हालचाल होत असते. या पद्धतीने एक व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीला संदेश देता येतो. त्यामुळे त्या व्यक्तीचा हात पहिल्या व्यक्तीच्या संदेशानुसार हलू लागतो. या प्रयोगात व्यक्तींच्या तीन जोड्या होत्या. प्रत्येक जोडीला प्रेषक (सेंडर) व ग्राहक (रिसीव्हर) दिलेला असतो. त्याचे काही फायदे–तोटे आहेत. सहभागी व्यक्ती वेगवेगळ्या परिसरात अर्धा किलोमीटर परिसरातील इमारतींमध्ये बसून मेंदूच्या मदतीने एकमेकांशी संपर्क साधू शकतात. यात प्रत्येक संदेश प्रेषक हा संगणक गेमपुढे असतो व त्यात एका शहरावर तोफांचा मारा होतो. ते होत असताना सहभागी व्यक्ती केवळ मेंदूच्या माध्यमातून चाच्यांच्या जहाजाने टाकलेली रॉकेट्स व तोफगोळे रोखू शकते व त्या गेममधील शहराचा बचाव करू शकते.



संबंधित आवारात एक व्यक्ती ग्राहक म्हणजे रिसीव्हर हेडफोन लावून अंधाऱ्या खोलीत बसते, तिला संगणकाचा गेम दिसत नसतो. ◆◆◆

## दृष्टीहीनांनाही आता पाहता येणार?

मंगळावर मनुष्य वसाहतीची स्वप्ने पाहणारे 'स्पेसएक्स', 'एक्स' आणि 'टेस्ला'चे सर्वेसर्वा एलन मस्क नवनवी संशोधने करवून घेण्यात, नवी उपकरणे बनवण्यातही प्रसिद्ध आहेत. आता एलन मस्क यांच्या ब्रेन–चिप स्टार्टअप कंपनी न्यूरालिंकने अंधांसाठी एक उपकरण तयार केले आहे. कंपनीचा दावा आहे की, ज्यांचे दोन्ही डोळे गेले आहेत त्यांनाही हे उपकरण पाहण्यास मदत करेल. या डिव्हाईसला अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) मान्यता मिळाली आहे. न्यूरालिंकने या उपकरणाला 'ब्लाइंडसाईट' असे नाव दिले आहे.



मस्क म्हणाले की, ज्यांचे दोन्ही डोळे गेले आहेत किंवा ज्यांच्या ऑप्टिक नर्व्हला इजा झाली आहे, त्यांच्यासाठी हे उपकरण उपयुक्त ठरेल. जन्मापासून अंध असलेल्यांना हे उपकरण दिसण्यास मदत करेल, असा दावाही करण्यात आला आहे. मस्क यांनी म्हटले की, हे उपकरण सुरुवातीला कमी–रिझोल्यूशनमध्ये दिसेल. हळूहळू दृष्टी सुधारेल. एवढेच नाही तर उपकरण बसवणाऱ्या व्यक्तीला इन्फ्रारेड आणि अल्ट्राव्हायोलेट लहरीही पाहता येणार आहेत.

यूएस सरकारने न्यूरालिंकच्या ब्लाइंडसाईट डिव्हाईसला ब्रेकथ्रू डिव्हाईस पदनाम दिले आहे. हे पदनाम अशा उपकरणांना दिले जाते जे जीवघेणी परिस्थिती टाळण्यास मदत करतात.

तत्पूर्वी, मस्क यांनी सांगितले होते की, न्यूरालिंक यावर्षी ८ रुग्णांच्या मेंदूमध्ये एक चिप रोपण करण्याचा विचार करत आहे. हे उपकरण अर्धांगवायू रुग्णांना मदत करेल. एलन मस्क यांनी पोस्टमध्ये जिओर्डीला फोर्जचा फोटोही शेअर केला आहे. जिओर्डीने 'स्टार ट्रेक : द नेक्स्ट जनरेशन' या मालिकेत काम केले. या मालिकेत त्याने एका अशा व्यक्तीची भूमिका साकारली आहे जो जन्मापासून अंध आहे, परंतु गॅझेटच्या मदतीने पाहू शकतो. ●●●



## सर्वप्रथम चक्रीवादळे कुणी ओळखली ?

'मोनालिसा'सारखी अजरामर कलाकृती बनवणारा इटालियन चित्रकार, शिल्पकार लिओनार्दो दा विंची याच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते. हा माणूस एक कलाकार असण्याबरोबरच संशोधकही होता. त्याच्या अनेक चित्रांचा, स्केचेसचा, डायरीतील नोंदींचा आजही अभ्यास होत असतो. लिओनार्दो दा विंची यानेच सर्वप्रथम चक्रीवादळे ओळखली, असे वैज्ञानिकांनी म्हटलेले आहे, हे विशेष!

ॲन पिझोरूसो या भूगर्भशास्त्रज्ञ व कला विद्वान महिलेने म्हटले होते की, लिओनार्दो दा विंची यांच्या चित्रांमध्ये आपल्याला चक्राकार आवर्तने दिसतात. उपग्रहांचा शोध लागण्याच्या पाचशे वर्षे आधी त्याने चक्रीवादळाचे हे चित्र काढले होते. पिझोरूसो हिने विंडसर कॅसल येथे राजदरबारी असलेल्या पुराच्या चित्रांचा अभ्यास केला होता. ही चित्रे विंचीने काढलेली आहेत. 'ट्विटिंग दा विंची' या पुस्तकात तिने हे निष्कर्ष मांडलेले आहेत. दा विंची याने १५१४ ते १५१८ या काळात १६ चित्रे काढली आहेत. उपग्रह तंत्रज्ञानाचा शोध लागण्याच्या आधी दा विंची याने कलेतून चक्रीवादळ दाखवले आहे. लिओनार्दो हा चक्रीवादळ ओळखणारा पहिला व्यक्ती होता व हवामान वैज्ञानिकांना त्याचा शोध १९७० च्या आसपास लागला होता. एखाद्या काल्पनिक अक्षाभोवती हवेचा प्रवाह फिरतो तेव्हा त्याला 'व्होरटेक्स फ्लो पॅटर्न' म्हणतात व पाणीही त्या पद्धतीने गोल फिरू शकते असे पिझोरूसोने म्हटले होते. हे प्रवाह हे चक्रीवादळासारखेच असल्याचे चित्रातून दिसते.

दा विंची याच्या आयुष्यात त्याच्या 'विंची' या मूळ शहरावरून चक्रीवादळ गेले होते, त्यावेळी अरनो नदीला पूर आला होता. त्यामुळे फ्लोरेन्समध्ये पुराचे पाणी शिरले होते. बेलिनझोना येथे आल्प्सजवळ दरडी कोसळल्या होत्या. ही वादळे कागदोपत्री नोंदलेली आहेत व वादळांमुळे झालेले हिमपात लिओनार्दोच्या नोंदीत सापडतात. त्यात तो म्हणतो की, डोंगर दरीत सात मैल परिसरात हिमपात कोसळून संपला व तेथे तळे तयार झाले. पिझोरूसो हिच्या मते, दाट चक्राकार प्रवाह हे पुराच्या चित्रात जास्त दिसतात याचा अर्थ विंचीने वादळे पाहूनच चित्रे काढली होती. त्यातील काही घड्याळाच्या काट्याच्या दिशेने तर काही त्याविरुद्ध दिशेने फिरणारी वादळे आहेत. वातावरणात प्रवाह असेच फिरत असतात. ◆◆◆



## एआय नव्हे एजीआय


सध्या सर्वत्र आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयचा बोलबाला आहे. मात्र आता आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स हा एक नवा प्रकारही येऊ घातला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स बाबतच्या संशोधनाचाच हा एक पुढचा भाग असून त्यामध्ये मानवापेक्षाही स्मार्ट अशी कॉम्प्युटर सिस्टीम तयार करण्यासाठी संशोधक प्रयत्न करीत आहेत. या संगणकांकडे स्वतःला समजून घेण्याची स्वतःला नियंत्रित करण्याची म्हणजेच सेल्फ– व अंडरस्टँडिंग आणि सेल्फ कंट्रोलची क्षमता असेल. त्यामुळे ते स्वतःच आपले कोड चक्क एडिटही करू शकतील! माणसाप्रमाणेच आधी प्रशिक्षण नसताना ते प्रॉब्लेम्स सोडवणे स्वतः शिकू शकतील.

कॉम्प्युटर सायंटिस्ट बेन गोर्टझेल आणि एआय संशोधक कॅसिओ पेन्नाचिन यांनी सर्वप्रथम २००७ मध्ये आपल्या काही शोधनिबंधांमधून ही आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्सची संकल्पना मांडली होती. ती मूर्त स्वरूपात येण्यासाठी अनेक वर्षे लागू शकतात. अनेक विज्ञानकथा आणि चित्रपटांमध्येही या संकल्पनेचा वापर रंजकतेने करण्यात आला. सध्याच्या वापरात असलेल्या एआय सेवांमध्ये फेसबुकसाठी वापरले जाणारे लर्निंग अल्गोरिदमचे बेसिक मशिन तसेच चॅटजीपीटीसारखे लार्ज लँग्वेज मॉडेल्स (एलएलएम) यांचा समावेश होतो. या सगळ्याला नॅरो म्हणून ओळखले जाते. त्याचा अर्थ ते माणसापेक्षा सरसपणे किमान एक टास्क करू शकतात, जसे इमेज ओळखणे. मात्र अशा कामांसाठी ते त्यांना दिलेल्या डेटापुरतेच मर्यादित असतात. एजीआय मात्र यापेक्षा वेगळे असेल. ते त्यांच्या ट्रेनिंगसाठी पुरवलेल्या डेटावरच अवलंबून राहणार नाहीत. ते एखाद्या माणसाप्रमाणेच नव्या गोष्टी शिकून घेऊन त्यावर काम करतील. अर्थातच मानवजातीसाठी हे संशोधन योग्य ठरेल का, याबाबतचा ऊहापोह संशोधक मंडळींमध्येही होत आहेच. यामध्ये धोकेही असल्याचे अनेक संशोधकांचे म्हणणे आहे.

एजीआय कधीही निर्माण होऊच शकत नसल्याचे मानणारेही काही संशोधक आहेत; मात्र काही संशोधकांना हे तंत्रज्ञान येत्या काही वर्षांमध्येच अस्तित्वात येऊ शकते असेही वाटते. असे ज्यांना वाटते, त्यांच्यामध्ये कॉम्प्युटर सायंटिस्ट रे कुर्झवल तसेच मार्क झुकेरबर्ग, सॅम ऑल्टमन आणि एलन मस्क यांच्यासारख्या सिलिकॉन व्हॅली एक्झिक्युटिव्हजचाही समावेश आहे. ◆◆◆

## नकली सूर्य बनवण्यात चीनची आघाडी

न्यूक्लिअर फ्यूजन ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्यामधून सूर्यालाही ऊर्जा मिळत असते. दीर्घकाळापासून क्लीन एनर्जी साठी म्हणजेच ज्या ऊर्जानिर्मितीत पर्यावरणाची, हवामानाची हानी होणार नाही, अशा ऊर्जानिर्मितीसाठी असा नकली सूर्य निर्माण करण्याच्या पर्यायाचा विचार केला जात होता. हा नकली सूर्य म्हणजे न्यूक्लिअर फ्यूजनची क्रिया. चीनच्या शांघायमध्ये एनर्जी सिंग्युलॅरिटी नावाचे एक स्टार्ट–अप आहे, जे न्युक्लिअर फ्यूजनवर काम करत आहे. या तंत्रज्ञानात पुढे जाण्यासाठी जगातील अनेक देश प्रयत्न करीत आहेत; मात्र सध्या चीन याबाबत अमेरिकेच्या पुढे असल्याचेच दिसून येते.



अनेक देशांना यामध्ये यश मिळालेले असले तरी दीर्घकाळापर्यंत ऊर्जा टिकवून ठेवणे कठीण असते. अमेरिका व चीन यादृष्टीने अव्वल आहेत; मात्र आता अमेरिकन कंपन्या आणि उद्योगजगत याबाबत चिंतित आहेत की या क्षेत्रात अमेरिका आपली आगेकूच गमावत आहे. त्याचे मोठे कारण म्हणजे चीनमधील अनेक कंपन्या क्लीन एनर्जीच्या क्षेत्रात पुढे आल्या आहेत. फ्यूजनमध्ये वर्चस्व मिळाल्याने एखाद्या देशाला संपत्ती व वैश्विक प्रभावातही पुढे जाता येऊ शकते. या मार्गाने अतिरिक्त ऊर्जेचे एक मोठे भांडार मिळते.


तेल किंवा गॅसच्या ज्वलनातून मिळणाऱ्या ऊर्जेच्या ४० लाख पट अधिक ऊर्जा न्युक्लिअर फ्युजनने मिळते.

फ्यूजन एनर्जी ही जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठीही एक चांगला उपाय ठरते. चीनी सरकार सातत्याने फ्यूजन एनर्जीसाठी पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहे. अमेरिकन ऊर्जा विभागाच्या फ्यूजन एनर्जी सायन्सेस कार्यालयाचे नेतृत्व करणारे जीन पॉल एलन यांच्या म्हणण्यानुसार चिनी सरकार दरवर्षी १ ते दीड अब्ज डॉलर्स यामध्ये गुंतवत आहे. त्या तुलनेत अमेरिका केवळ ८०० दशलक्ष डॉलर्स खर्च करीत आहे. दोन्ही देशांच्या प्रायव्हेट सेक्टरला हा विश्वास आहे की या मार्गात कितीही आव्हाने आली तरी २०३० पर्यंत फ्युजनच्या ऊर्जेने वीज मिळू शकेल. अमेरिका हा पहिला असा देश होता ज्याने १९५० च्या दशकातच यादृष्टीने प्रयत्न सुरू केले होते. फ्यूजनबाबत चीनची एंट्री बरीच उशिरा झाली. २०१५ नंतर चीनमध्ये फ्यूजनबाबतचे पेटंट वाढू लागले. अर्थात कोणत्याही अन्य देशांच्या तुलनेत चीनमध्ये त्यांची संख्या अधिक आहे. ◆◆◆

## 'स्निफफोन' करणार रोगनिदान

स्मार्टफोन ही आता आपल्या दैनंदिन गरजेची वस्तू बनलेली आहे. केवळ कॉल करणे व घेणे यापुरता हा फोन मर्यादित नसून तो बहुपयोगी आहे. त्यामुळे भविष्यात स्मार्टफोनचा वापर रोगनिदानासाठीही केला जाऊ लागला तर त्याबाबत आश्चर्य वाटायला नको. त्यादृष्टीने एक संशोधन आधीच झालेले आहे! संशोधकांनी प्राणघातक रोगांचे निदान करू शकणारे स्मार्टफोन तयार करता येतील असे नवे तंत्रज्ञान विकसित केलेले आहे. यात ब्रेथ ॲनॅलायझर व स्मार्टफोन यांच्या तंत्रज्ञानाचा मिलाफ करून 'स्निफ फोन' तयार करण्यात यश आले आहे.

टेकियॉन–इस्रायल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेचे प्राध्यापक होसम हाइक यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन करण्यात आले आहे. त्यात स्मार्टफोनचा वापर रोगनिदानासाठी करता येतो, अर्थात या संशोधनाची ही प्राथमिक अवस्था आहे. स्मार्टफोन हा जर एका विशिष्ट तंत्रज्ञानासमवेत वापरला तर वापरकर्त्यांच्या श्वासावरून रोगांचे निदान करता येते, त्यामुळे या फोनला स्निफफोन असेही म्हटले आहे. यात स्निफफोन प्रकल्पात हाइक यांनी तयार केलेले श्वास विश्लेषक यंत्र स्मार्टफोनला जोडले जाते व त्यामुळे शरीराला कुठेही छेद न देता चटकन व स्वस्तात रोगनिदान करता येते. या ब्रेथॲनॅलायझर म्हणजे श्वासविश्लेषकात सूक्ष्म व अतिसूक्ष्म संवेदक वापरलेले असून ते बाहेर टाकलेल्या श्वासातील घटकांचे विश्लेषण केले जाते व ती माहिती मोबाईल फोनला दिली जाते व त्यातील संस्कारकाच्या मदतीने माहितीचे विश्लेषण केले जाते.



यामधील इलेक्ट्रॉनिक नाकासारखे काम करणारे ब्रेथ ॲनॅलायझर (श्वास विश्लेषक) तंत्रज्ञान २००६ पासून विकसित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सामान्य लोकांनाही श्वासाच्या मदतीने रोगांचे निदान करता येते व त्यावर उपचार करणे सोपे जाते. सिमेन्स जर्मनी, ऑस्ट्रिया, फिनलंड, आर्यलंड व लॅटव्हिया व इस्रायली कंपनी नॅनोव्हेशन–जीएस इस्रायल यांनी यात सहभाग घेतला होता. स्निफफोन हा अंतिम रूपात स्वस्त व आकाराने लहान केला जाणार असून, त्यामुळे रोगांचे निदान करणे शक्य होणार आहे, असे हाईक यांनी सांगितले. ◆◆◆

## कृष्णविवरांची दुर्मीळ जोडी

एकेकाळी कृष्णविवरांचे अस्तित्व केवळ सैद्धांतिकच होते. मात्र, आता त्यांचे अस्तित्व केवळ सर्वमान्यच आहे असे नाही, तर त्यांचे छायाचित्रही टिपण्यात यश आलेले आहे. एखाद्या ताऱ्याचा मृत्यू झाला की त्याचे रुपांतर प्रचंड आकर्षण शक्ती असलेल्या कृष्णविवरात होत असते. त्यांच्या तावडीतून प्रकाशकिरणही सुटू शकत नसल्याने ही विवरे अंधारात लपल्यासारखी वाटतात. प्रत्येक आकाशगंगेच्या केंद्रभागी असे एक ब्लॅकहोल किंवा कृष्णविवर असते. कधी कधी त्यांची जोडीही असते. वैज्ञानिकांनी अशीच अतिशय जास्त वस्तुमानाच्या कृष्णविवरांची जोडी एका निष्क्रिय दीर्घिकेभोवती फिरताना शोधलेली आहे.



युरोपीय अवकाश संस्थेच्या एक्स–रे मल्टी मिरर मिशनने ही कामगिरी पार पाडली. एक्सएमएम–न्यूटन असे या मोहिमेचे नाव आहे. आतापर्यंत फारच थोडी द्वैती कृष्णविवरे सापडली आहेत. पण ती सर्व सक्रिय दीर्घिकत म्हणजेच आकाशगंगेत होती. अधिक वस्तुमानाची द्वैती कृष्णविवरांच्या अभ्यासातून दीर्घिका कशा तयार झाल्या असाव्यात याची माहिती मिळते.

खगोल वैज्ञानिकांनी शोधलेली ही द्वैती कृष्णविवरे निष्क्रियेत सापडली आहेत, असे बीजिंगच्या पेकिंग विद्यापीठातील फुकुन लिऊ यांनी म्हटले आहे. कारण, ज्या दीर्घिकत ही कृष्णविवरे सापडली आहेत ती निष्क्रिय आहे. मॅक्स प्लांक इन्स्टिट्यूट ऑफ रेडिओनॉमीचे स्टेफनी कोमोसा यांनी सांगितले की, अनेक दीर्घिकांमध्ये द्वैती कृष्णविवरे आहेत; पण ती केंद्रस्थानी आहेत, त्यांना शोधणे फार अवघड असते. कारण, त्यात वायुमेघ नसतात व दीर्घिकांचे गाभे काळे असतात. यातील मूळ कृष्णविवर हे १ कोटी सौर वस्तुमानाचे असून ते १० लाख सौर वस्तुमान असलेल्या कृष्णविवराभोवती अंडाकार कक्षेत फिरत आहे. दोन कृष्णविवरांतील अंतर ०.६ मिलीपार्सेक म्हणजे २००० प्रकाशवर्षे आहे. म्हणजे हे अंतर सौरमालेच्या रुंदीइतके आहे. ◆◆◆

## अग्निसाक्षी नव्हे जलसाक्षी!

भारतातील प्रत्येक राज्यात विविध भाषा, परंपरा पहायला मिळतात. अशाच प्रकारे लग्नकार्याची परंपरा सुद्धा अनेक भागांत वेगवेगळी असते. देशातील बहुसंख्य ठिकाणी अग्नीला साक्षी मानत विवाह सोहळा होतो, पण भारतातील अशी एक जागा आहे जिथे अग्नीला नाही तर पाण्याला साक्षी मानून लग्नाचे विधी होतात.

छत्तीसगडमधील बस्तरमध्ये ही परंपरा सुरू आहे. ही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून चालत आलेली आहे. येथील आदिवासी समाज नेहमीच निसर्गाची पूजा करतो. लग्नसमारंभात होणारा वायफळ खर्च रोखण्यासाठी या ठिकाणच्या नागरिकांनी ही परंपरा सुरू केली आहे. छत्तीसगडमधील हा समाज केवळ विवाहातच नाही तर सर्व शुभ कार्यात पाण्याला साक्षी म्हणून विधी करतात. हा समाज पाण्याला आपली आई मानतो. त्यामुळे हे नागरिक पाण्याला खूप महत्त्व देतात. धुर्वा समाज हा बस्तर येथील रहिवासी आहे. धुर्वा समाजाची जुनी पिढी कांकेर नदीच्या पाण्याला साक्षी मानून सर्व शुभ कार्य करतात. हे नागरिक आजही कांकेर नदीतून पाणी आणतात आणि नवविवाहित जोडप्यावर शिंपडतात. त्यानंतर लग्नाचे विधी पूर्ण करतात.



भारतीय लग्नकार्यात वधू आणि वर हे अग्नीला साक्षी मानत सात फेरे घेतात. त्यानंतर विवाहाचे विधी पूर्ण होतात, पण भारतातील या समाजात अग्नीला नाही तर पाण्याला साक्षी मानून लग्नाचे विधी पूर्ण करतात. ही परंपरा आदिवासी समाजाची असून शेकडो वर्षांपासून सुरू आहे.

आदिवासी समाजाने नेहमीच जल, जंगल आणि जमीन यांची पूजा केली आहे. आदिवासी समाजातील जे नागरिक पाण्याला साक्षी मानून विवाह सोहळा पार पाडतात ते धुर्वा समाजाचे असतात. पाणी हे जीवन देणाऱ्या पवित्र देवतेसारखे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लग्नात वापरण्यात येणारे पाणी हे खूप खास असते. हे पाणी बस्तरमध्ये वाहणाऱ्या कांकेर नदीचे आहे. दुर्वा समाजात कांकेर नदी अतंयत पवित्र मानली जाते. या समाजात या नदीच्या पाण्याशिवाय कोणतेही शुभ कार्य पूर्ण मानले जात नाही. या भागातील नागरिक हे लग्नात वधू–वर यांच्यासोबत संपूर्ण गावात फेऱ्या मानतात. तसेच हुंडा म्हणून काहीही घेतले जात नाही. ही परंपरा कोणी मोडण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या विरोधात सर्वजण एकवटतात आणि दंड ठोठावला जातो. ●●●

**सुरक्षा तुमची सर्व्हिस आमची**
CCTV Camera Set 9999/- (नियम व अटी लागु)
घर, दुकाने, हॉटेल, अपार्टमेंट, कॉलेज
**गोल्डन एंटरप्रायजेस**
दिल्लीगेट, अहिल्यानगर
7304099919

|| चैतन्य ||
**काळे फार्म हुरडा पार्टी केंद्र**
नगर-पुणे हायवेटच (मु. पो. चास, ता.जि.अ.नगर)
कोवळा-लुसलुशीत हुरडा, खमंग चटण्या, दही, गुळ, गोडी शेव, रेवडी, उसाचा रस, चहा नाष्टा शेतावरचे गावराण जेवण..
संपर्क : विजय काळे 7773934398


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक - २७/१२/२०२४

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील **मौजे टि पी स्कीम नंबर ३ मधील खालील वर्णनाची मिळकत**

| फायनल प्लॉट नंबर | सब प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १६ | ४६ | ४९४.७०५ चौ मी (५३२५.०० चौ फुट) |

व त्यावरील असलेले संपुर्ण बांधकाम क्षेत्र ४४९.१६ चौ मी.

**यांसी चतु:सीमा -**
पुर्वेस - रोड | दक्षिणेस - सब प्लॉट नंबर ४५
पश्चिमेस - सब प्लॉट नंबर ४७ | उत्तरेस - कॉलनीचा खाजगी रोड

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे संपुर्ण ८ आणे हिश्याचे दक्षिणेकडील बाजुचे प्लॉटचे क्षेत्र २४७.३५२५ चौ मी. (२६६२.५० चौ फुट) व त्यावरील असलेले संपूर्ण बांधकाम क्षेत्र २२४.५८ चौ मी. सदर मिळकत ४४ वर्षे जुनी आहे.

**यांसी चतु:सीमा -**
पुर्वेस - रोड | दक्षिणेस - सब प्लॉट नंबर ४५
पश्चिमेस - सब प्लॉट नंबर ४७ | उत्तरेस - सब प्लॉट नंबर ४६ पैकी उर्वरित क्षेत्र

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक-**
**श्री. प्रशांत वसंत शहा** रा. कांदीवली वेस्ट, मुंबई.

**ॲड. प्रणव सुधीर धर्माधिकारी**
**ॲड. सौ. नुतन प्रणव धर्माधिकारी**
मो.नं.९०२८००८२००
पत्ता - भंडारी सावज अपार्टमेंट, कोठीरोड, अहमदनगर


**प्लॉट विकणे**
हॉटेल सिटीप्राईडजवळ एकविरा चौक येथे प्राईम लोकेशनमध्ये १४२० स्के. फुट पुर्वमुखी प्लॉट विकणे आहे.
9834637850

**घर विकणे**
सिव्हिल हडको कॉलनी शिवाजी चौक येथे घर नं. ९०/५४८ घर विकणे आहे
8275280181

**रोडटच गाळा भाड्याने देणे**
सर्जेपुरा येथे 500 स्क्वे. फुट गाळा भाड्याने देणे आहे
9822294670
9822261341

**रो हौसींग भाड्याने देणे**
आलमगीर ब्रह्मतळे कमानीजवळ, साईबाबा कॉलनी येथे दोन रुम, संडास-बाथरुम अॅटॅच असलेले
9763992590

**बंगलो/प्लॉट विकणे**
G. क्र. 208/+209, मोहिनीनगर, आदर्शनगर रोड, केडगाव, अहिल्यानगर NA प्लॉट, प्लॉट क्षेत्रफळ 3333 चौरस फूट, 1400 चौरस फूट बांधकाम, 4 बीएचके, पाण्याचे बोअर, + कॉर्पोरेशनचे पाणी 2 नारळ, 3 आंब्याची झाडे
8766582543

**बंगला भाड्याने पाहिजे**
गुलमोहररोड, एकवीरा चौक, पाईपलाईन, श्रीराम चौक या परिसरात 2 बीएचके बंगला स्वतंत्र सर्व सोयीयुक्त पाहिजेत. (एजंट क्षमस्व)
8007835909
7498107977

**पाहिजेत**
FMCG (फूड प्रॉडक्ट्स) विक्रीसाठी
* अनुभवी सेल्सपर्सन (नगर शहर किंवा आजू बाजू परिसराचा कामाचा अनुभव आवश्यक)
* सहाय्य सेल्सबॉय
अर्जासह समक्ष त्वरित भेटा
**निता एंटरप्राईजेस्**
हॉटेल सनी पॅलेस शेजारी, छ.संभाजी नगर रोड, अहिल्यानगर
9373340163

**त्वरित पाहिजेत**
तारकपूर येथील कार्यालयात ५ जागा मुलांसाठी भरणे आहेत
वेळ : सायं. ६ ते १०
संगणक ज्ञान, एक्सेल प्रोग्राम व इ-फायलिंग तसेच मराठी/इंग्लिश टायपिंग आवश्यक
अनुभवी असल्यास प्राधान्य
संपर्क
94220 80597

**पाहिजेत**
• कुक
• वेटर • रूम बॉय
• महिला सफाई कामगार
• पुरुष सफाई कामगार
• वॉचमन (रात्रपाळी)
भेटण्याची वेळ : स. १० ते १ वा. पर्यंत
**हॉटेल प्रेमदान**
सावेडी रोड, प्रेमदान चौक, अ.नगर.
मो. 9422237592, 9420028906

**पाहिजेत**
• टेलिकॉलर
• मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह
अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक :
9699787086

**अनुभवी सेल्सगर्ल पाहिजे**
शशिकला फॅशन शॉपी
8080197781

**पाहिजेत**
ऑफिस कामासाठी कायमस्वरुपी पदवीधर मुलगा पाहिजेत
कॉमर्स असल्यास प्राधान्य
7972430745

**पाहिजेत**
लेडीज : ३ (१२ वी पास)
इंग्लिश लिहिता व वाचता येणे आवश्यक
सावेडी नाका, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर
7248931475

रॉयल ईनफिल्ड सर्व्हिस सेंटरसाठी
**पाहिजेत**
वॉशिंगसाठी मुले : ०२
टेलीकॉलींगसाठी लेडीज : ०२
**किरण ऑटोमोबाईल्स्**
कायनेटिक चौक, अ.नगर
पालवे सर
8962800800
- Available Services -
1. Spares 2. Service 3. Bike Rent
4. Royal Enfield RSA Service

**पाहिजे**
कॉम्प्युटरवर ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी सायबर कॅफेचा अनुभव असलेले स्त्री/पुरुष पाहिजे
9766097783

**पाहिजेत**
* कामासाठी मुले : २
* लेडीज कामगार : २
* सेल्समन : ४
* ड्रायव्हर : १
-: राज मार्केटिंग :-
ब्रिटानिया अधिकृत विक्रेते.
शॉप नं. १५०४, वंजार गल्ली, रायगड चौक, राऊत हॉस्पिटल जवळ, गोविंद ट्रान्सपोर्ट समोर, अ.नगर...
9028888171


## Requirement

| Sr. No. | Requirement | Experience | Posts |
|---|---|---|---|
| 1. | Press Operator | Minimum 2 Years | 1 |
| 2. | Moulders | Minimum 1 Year | 2 |
| 3. | Buffer cum Belt grinder operator | Minimum 2 Years | 2 |
| 4. | Helpers | | 2 |

NAIKWADI INDUSTRIES
B-94, MIDC, Ahilyanagar - 414111
Tel : 9325100657



**गाळे भाड्याने देणे आहे**
सिध्दीबागेजवळ ऑफिस, पतसंस्था, फायनान्स इतर व्यवसायासाठी गाळे सर्व सोयी-सुविधायुक्त भाडेतत्वावर देणे आहे.
- संपर्क -
Mo. 9270570699

**वधू पाहिजेत**
२२ ते ६० वय, सर्व समाज विधवा, घटस्फोटीत जीवनाला कंटाळलेले पुनर्विवाह, रजिस्टर आताच करा.
पत्ता : माळीवाडा
डॉ. 9892911602

सर्व सामान्यांच्या मनात आदराचे स्थान मिळविले
कामाची निष्ठा सर्वांबद्दल आस्था, प्रेम आणि आपुलकीने
गच्च भरलेलं आपलं हृदय सदैव धडधडतं दुसऱ्यांसाठी
अल्पसंख्यांक समाजामध्ये शैक्षणिक जागरुकता निर्माण करणारे
**शिक्षण महर्षी**
**मा.डॉ.पी.ए.इनामदार**
(चान्सलर - डॉ.पी.ए.इनामदार युनिव्हर्सिटी, पुणे)

**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**
शुभेच्छुक - IQRA EDUCATION & WELFARE SOCIETY'S
P.A.INAMDAR ENGLISH MEDIUM SCHOOL & JUNIOR COLLEGE
Iqra Campus, Govindpura, Ahmednagar
Mr. A. Rahim Khokar (Chairman) | Er. Iqbal Sayyed (Vice Chairman)
Er. Vikar S. Kazi (Secretary) | Dr. Khalid S. Shaikh (Treasurer)
Mr.Firosali Marakkattil (Principal) | Mr.Shabbir CK (Adminstrator)
Mrs. farhana Shaikh (Vice Principal), | All Teachers, Staff & Students


REVOLUTION in animation world
graphic designing
web designing
2d & 3d animation
18 MONTH PROGRAM
COURSE HIGHLIGHTS
Complete 3D Animation career program
Industry visits & workshops
Making a portfolio after every Module
E-Projects
CERTIFICATE COURSE IN
SOFTWARE PROGRAMMING
C Programming
C++ Programming
Data Structure, PHP
Python, Java
.Net
Duration : 6 Months
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769



**डॉ.अद्वैत गिते**
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
**न्युरो फिजिशिअन**
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिद्ध निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
**अक्षय (गिते) हॉस्पिटल**
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत


घ.नं. 883-A/भिंगार/2024-25
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक- 26/12/2024

## जाहीर नोटीस

या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. दिपक गोविंदराव गायकवाड, वय 44 वर्षे, धंदा-नोकरी राहणार माळगल्ली, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. 883-A, सर्व्हे नं. 211-846-A भिंगार, अहमदनगर छावनी परिषद हे (1) रजिस्टर्ड खरेदीखत क्रं. 9366/2024 दिनांक 11/10/2024 (2) रजिस्टर चुक-दुरुस्ती लेख क्र. 10734/2024 दिनांक 29/11/2024 च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 30 (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावणी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे.


सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

घ.नं. 883-A, भिंगार,
क्षेत्रफळ 263.57 चौ.फूट

कार्यालय अधिक्षक,
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)


टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात | दिनांक : 25 डिसेंबर 2024 ते 2 जानेवारी 2025

HIN- 11:30 AM 04:45 PM
MUFASA THE LION KING -3D

(HINDI) 8:30 AM I 9:45 AM 12:00 PM I 1:45 PM 4:25 PM I 6:45 PM 7:25 PM I 10: 35 PM
BABY JOHN
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking

PUSHPA - 2 THE RULES
8:15 AM I 12:45 PM 3:00 PM I 07:00 PM 9:45 PM I 10:30 PM
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVALLBLE ON bookmyshow | CONNPLEX SMART THEATRE | AVALLBLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001


**कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालय, अहिल्यानगर**
ई-मेल ॲड्रेस:- nagartahsildar@gmail.com
दूरध्वनी क्रमांक:- ०२४१-२४११६००
क्र. कावि/ Mag-२/६२१/२०२४
अहिल्यानगर दि. २६/१२/२०२४

## जाहीर नोटीस

पप्पु किसन कुऱ्हाडे
रा. अहिल्यानगर, ता. जि. अहिल्यानगर } वादी
विरूद्ध
अधिकारी, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर } प्रतिवादी

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार पप्पु किसन कुऱ्हाडे यांची आई नामे गंगुबाई किसन कुऱ्हाडे यांचा दि. १५/०२/२०१९ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसा मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार पप्पु किसन कुऱ्हाडे यांची आई नामे गंगुबाई किसन कुऱ्हाडे यांचा मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुराव्यानिशी मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे गंगुबाई किसन कुऱ्हाडे यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांच्याकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दि. २६/१२/२०२४ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**तहसीलदार अहिल्यानगर करिता**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालय, अहिल्यानगर**
ई-मेल ॲड्रेस:- nagartahsildar@gmail.com
दूरध्वनी क्रमांक:- ०२४१-२४११६००
क्र. कावि/ Mag-२/६२२/२०२४
अहिल्यानगर दि. २६/१२/२०२४

## जाहीर नोटीस

पप्पु किसन कुऱ्हाडे
रा. अहिल्यानगर, ता. जि. अहिल्यानगर } वादी
विरूद्ध
अधिकारी, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर } प्रतिवादी

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार पप्पु किसन कुऱ्हाडे यांचे वडील नामे किसन लक्ष्मण कुऱ्हाडे यांचा दि. १८/०८/२०२२ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसा मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार पप्पु किसन कुऱ्हाडे यांचे वडील नामे किसन लक्ष्मण कुऱ्हाडे यांचा मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुराव्यानिशी मा. तहसीलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे किसन लक्ष्मण कुऱ्हाडे यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांच्याकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दि. २६/१२/२०२४ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**तहसीलदार अहिल्यानगर करिता**

## जाहीर निविदांतर्गत खुली निविदा सूचना

ग्रामपंचायत करोडी. ता. पाथर्डी जि.अहमदनगर यांचे कडून जिल्हा परिषद नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या मार्फत दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या निविदा मागवत आहे.

| अ. नं. | कामाचे नाव | योजना | निविदा रक्कम | निविदा संचाची रक्कम | बयाना रक्कम | कामाची मुदत | अधिकृत ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १. स्मशानभूमी दुरुस्ती करणे.<br>२. स्मशानभूमी सुशोभीकरण करणे. | १५ वित्त आयोग | ७४,५४०/-<br>७३,१८४/- | २३६ | सुट | ६ महिने | सु. बे |

(१) निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून कोऱ्या निविदा संच दि. २७/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दि. ०३/०१/२०२५ सायं. १७.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) निविदा दर टाकून सिलबंद लिफाफ्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयात सादर करता येतील. (२) निविदा संदर्भात सविस्तर माहिती अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. तसेच ब-१ निविदा संच फॉर्म ग्रा. पं. मध्ये विक्री साठी उपलब्ध आहे. (३) निविदा ०४/०१/२०२५ रोजी सकाळी १०:०० ग्रा.पं. करोडी येथे उघडण्यात येतील. (४) निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे. (५) निविदेसोबत आवश्यक ती सर्व कागदपत्र जोडावे.

सही
ग्रा. पं. अधिकारी ग्रा. पं. करोडी
ता.पाथर्डी जि.अहमदनगर

सही
सरपंच ग्रा.पं. करोडी
ता.पाथर्डी जि.अहमदनगर



**गिझर खराब झाला आहे?**
आता टेक्नीशियन लवकर भेटेल की नाही याची चिंता सोडा..
**मे. अभय सेल्स** सोबत संपर्क साधा.. एकदा अवश्य भेट द्या.
**मे. अभय सेल्स**
कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING

बेबी जॉन
08.00AM I 09.00AM
10.45AM I 02.30PM
03.00PM I 05.20PM
09.45PM I 11.10 PM

पुष्पा - २
11.00AM | 12.00PM
01.45PM (3D) | 03.45PM
06.00PM | 07.30PM
09.45PM | 10.35 (3D)

मुफासा (3D)
Hindi
08.30AM I 8.15PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar.
9881300400, 0241-2346000
Cinélife™ MINIPLEX

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त
**इंडो आयरिश हॉस्पिटल**
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा
**मोफत सर्व रोग तपासणी शिबीर**
सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडुन)
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी
* मोफत ॲन्जीओप्लास्टी
* माफत डायलेसीस/किडनी विकार
* माफत कर्करोग शस्त्रक्रिया
* मोफत नवजात अतिदक्षता विभाग
* मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी | २४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनेग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंधत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
* शिबीरस्थळ *
**इंडो आयरिश हॉस्पिटल**
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336,
मो. 9130423336, 9860310001
टिप : नांव नोंदणी आवश्यक
मोफत ओ.पी.डी.